म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा ठाणे
विषय : नाटक
दा.क्र. : २२५७५

IRBK-0122575



# डबल गेम

सुरेश जयराम

IRBK-0122575

मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे

□ प्रकाशक
अनिलकुमार मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

□ © सुरेश जयराम

□ प्रथमावृत्ती
मार्च १९८८

□ मुखपृष्ठ : सुरेश नावडकर

□ मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

□ मूल्य वीस रुपये

पारशी, गुजराती आणि इंग्रजी रंगभूमीचा
विनोदी नट—
**दिन्यार कॉन्ट्रॅक्टर**
या माझ्या मित्राला—

" डबल गेम " या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग; ' श्री. दत्तात्रय प्रॉडक्शन्स ' तर्फे रविवार दि. ९ ऑगस्ट १९८७ (नारळी पौर्णिमा ) रोजी सकाळी १०–१५ वाजता गडकरी रंगायतन, ठाणे येथे सादर करण्यात आला.

**या प्रयोगात भाग घेणारे कलावंत व तंत्रज्ञ**

रणजित : सुहास पळशीकर
अभिजित : पळशीकर सुहास
पद्मा : स्वाती चिटणीस
सुब्रह्मण्यम् : राघवेंद्र कडकोळ
पहिला हवालदार : छोटु आजगावकर
दुसरा हवालदार : प्रफुल्ल संघाणी
इन्स्पेक्टर सूर्यवंशी : उदय म्हैसकर
निशा : भक्ति बर्वे – इनामदार

दिग्दर्शन : प्रकाश बुद्धिसागर
नेपथ्य–प्रकाश : संदीप कश्यप
पार्श्वसंगीत : पुरुषोत्तम बेर्डे
वेशभूषा : रवि क्रिएशन्स / उदय टेलर्स, दादर
रंगभूषा : सुरेश–बाबुलनाथ
नेपथ्यनिर्मिती : अनंत वालावलकर आणि मंडळी
रंगमंच व्यवस्था : मधुकर घाडीगावकर, वासुदेव भोसले.
प्रकाशयोजना सहाय्यक : चंद्रकांत गुरव
वेशभूषा सहाय्यक : अशोक बिर्जे
ध्वनिमुद्रण : नंदलाल रेळे, पंचम स्टुडिओ
ध्वनिसंयोजन : बाबल नाईक
प्रसिद्धी : रेडीकल पब्लिसिटी
व्यवस्थापक : छोटु आजगावकर
पुणे व्यवस्था : मनोहर कुलकर्णी– मनोरंजन
निर्मितिप्रमुख : प्रफुल्ल संघाणी
सूत्रधार : अनंत लोणे
निर्माता : अनुदीप लोणे

---

" डबल गेम " या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क सौ. शारदा सुरेश जयराम यांच्या स्वाधीन आहेत. लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि परवानगी मूल्य या संबंधांत– सौ. शारदा सुरेश जयराम, शांता कुटिर, प्लॉट नं. २०२/९, जवाहर-नगर, गोरेगाव, मुंबई ४०००६२– या पत्त्यावर पत्र-व्यवहार करावा.

डा. वाचनालय शाखा.
श. क्र. 22545 नों. दि. 5.5.88


## दुहेरी भूमिका–

आपल्याच नाटकाला नावं ठेवण्याइतका आता मी नाट्यव्यवसायात रुळलेलो आहे. " शांतेचं कार्ट चालू आहे " हे नाव मीच ठेवलं, असा गैरसमज बऱ्याचजणांचा असला, तरीही नाटकाचं नाव ठरवण्याच्या नाजूऽक आणि महत्त्वाच्या कामात माझा सहभाग असतो हेही तितकंच खरं !

नाटकाचं नाव ठरवणं; ही या व्यवसायातली सर्वात कठीण गोष्ट ! माझा एक लेखकमित्र म्हणतो, ' पानंच्या पानं भरून नाटक लिहिणं एक वेळ सोपं; पण त्याचं नाव ठरवणं हे तितकंच कठीण ! ' नवीन नाटकाच्या नावाबद्दलची प्रतिक्रिया देताना भलीभली मंडळी ताठरतात. पटकन् आपले खरे आणि मोकळे मत देऊ धजत नाहीत, कारण त्यावर सगळं व्यावसायिक यश–अपयश ठरणार असतं ! त्यातून, काही निर्मात्यांना नवाक्षरी नाव लाभतं, तर कुणाला सात अक्षरी ! कुणाला नावात ' नकार ' नको असतो; तर कुणी ' न्हिद्रम् 'चा हट्टच धरतो ! शिवाजीमंदिरच्या कट्ट्यावर, एखाद्या नवीन येणाऱ्या नाटकाचे अपयश गृहित धरून, त्याच्या नावावरनं काय-काय विनोद होऊ शकतील याच्या शक्यताच आधी पडताळल्या जातात ! थोडक्यात काय,–नावात काय आहे ! म्हणणाऱ्या शेक्सपियरला मराठी रंगभूमीच्या ' कट्ट्यावर ' स्थान नाही !

" डबल गेम " हे नाव लेखकानेच ठेवलेले. ते समर्पक असूनही, त्याहीपेक्षा एखादे ' कॅची ' नाव मिळाले तर बरे ! अशी जवळजवळ प्रत्येकाची भूमिका होती. तालमीतून काही मिळाले तर बघू, असं म्हणून तालमी सुरू झाल्या. थोड्याफार शाब्दिक कसरती करून काढलेली काही नावे पोरकट म्हणून बाद झाली. काही नावांमध्ये जोर नव्हता. (अंहं–' फोर्स ' नव्हता !) तर काही नावं मराठी प्रेक्षकांनाच अपरिचित वाटावी इतकी मराठी निघाली ! साहजिकच, दुसरे ' कॅची ' नाव मिळाले नाही; म्हणून डबल गेम हे पाळण्यातले नावच कायम झाले. त्याचे नव्याने बारसे न करण्याचे ठरले.

आत्तापर्यंत, नाटकाचे बारसे करण्याची सवय लागलेल्या मी, यावेळी नाटककाराचे बारसे मात्र नव्याने केले ! रसिक प्रेक्षकांना नाक मुरडण्याची एकही संधी मिळू नये, म्हणून सुरेश पिप्रोडिया हे गुजराथी नाव बदलून; मराठी नाव ठेवण्याचा प्रस्ताव मांडला– तोही

जरा भीतभीतच. परंतु लेखकानेही फारसे आढेवेढे न घेता ही कल्पना उचलून धरली. आमचे मित्रवत् गुरू कै. नाना पगार यांच्याशी बोलताना अनेकदा हा विषय निघायचा, ते नेहमी म्हणायचे, " मराठी नाट्यरसिक भाबडा असतो. समजा, एखादं नाटक विनोदी असेल, तर नाटकाशी निगडित सर्वांची नावे विनोदाशी नातं सांगणारी हवीत. निदानपक्षी ही नावं सोपी, सुटसुटीत तरी असावीत. अन्यथा; त्याचा एक वेगळाच ताण बसून, प्रेक्षकांनी नाटकाकडे पाठ फिरवली, तर त्यात त्यांचा काय दोष ? "
नानांचं हे म्हणणं केवळ विनोदीच नाटकांना नाही, तर प्रत्येक नाटकाला लागू पडू शकतं. आता हेच पहाना ! लपंडाव, लफडा-सदन, राहु-केतु इ. चांगली चांगली नाटकं लिहिणारा सुरेश पिप्रोडिया; हा गुजराथी कुटुंबात जन्मला असला, तरी त्याचं शिक्षण, आणि विशेषतः नाटकीय शिक्षण मराठीतूनच झालेलं आहे. त्याचा मित्र-परिवार इतका मराठमोळा आहे की, गुजराथीपेक्षा मराठी भाषाच त्याला जास्त जवळची. पण केवळ पिप्रोडिया आडनावामुळे त्याच्याबद्दल अनेक गैरसमज पसरलेले आहेत. तो गुजराथी लेखक आहे ! त्याला मराठी येतच नाही ! वगैरे वगैरे. व्यवसायातले जाणकार म्हणवणारे देखील हे अपसमज गोंजारत असतात.
खरं पाहाता, नाट्यलेखनासाठी; सुरेश पिप्रोडियाने सुरुवातीला एखाददुसरं भाषांतर वगळता; नंतर गुजराथी संहितेचा आधार घेतलेला नाही. सगळी नाटकं त्याने इंग्रजीवरूनच लिहिलेली आहेत ! ( इंग्रजीवरून लिहिलेली आहेत म्हटलं; म्हणून दचकायला काय झालं ? प्रमाण थोडं कमीजास्त असेल; पण जवळपास सर्व मराठी लेखक ' इंग्रजीवरूनच लिहितात ', यात रहस्य असे काहीच नाही ! काहीजण कबूल करतात, काही नाही कबूल करीत ! )
इंग्रजीचे भाषांतर केले काय किंवा गुजराथीचे ' वेषांतर ' केले काय ? प्रेक्षकांना चांगली नाटके द्या म्हणजे झालं- असे आपले माझे मत.
कै. बबन प्रभू लिखित ' पळा पळा कोण पुढे पळे तो ' ज्या काळात व्यावसायिक रंगभूमीवर आले, त्याच काळात सुरेश पिप्रोडियाचे ' छडी लागे छम् छम् ' हे नाटक हौशी रंगभूमी गाजवत होते. दोन्हींचे उगमस्थान एकच ! रूपान्तर वेगवेगळे असूनही रंगतींत अजिबात फरक नव्हता. हा एक सुदैवी योगायोगच ! असे योगायोग बऱ्याचजणांच्या बाबतीत कळत-नकळत घडत असतात— असो. मुद्दा; सुरेश पिप्रोडियाची तुलना बबन प्रभूंच्या लेखन-कौशल्याशी करण्याचा नसून, परदेशी नाट्यविषयक अभ्यासाचा आहे, अभ्यासात पिप्रोडिया स्वतंत्रपणे कुठेही कमी पडत नाहीत हे सांगण्याचा आहे. त्यांच्याबद्दल पसरलेले गैरसमज दूर व्हावेत, म्हणूनच नामांतराचा निर्णय झाला. त्याच्या आजवरच्या लेखन-कौशल्याचे पुण्य पदरी न पडण्याचा धोका पत्करून; सुरेश पिप्रोडियाचा सुरेश जयराम झाला ! ( सुज्ञ वाचक रहस्यभेद करून याचा बोभाटा करणार नाहीत अशी आशा आहे !)
फार्सशी माझं न् सुरेशचं स्वतंत्रपणे नातं तयार झाल्यानंतर आमची भेट झाली. अशा

समीकरणाचा त्रास होण्याचे मुख्य कारण, सध्याच्या नाटकांमधला तिथल्या तिथं घोळत राहाणारा विनोद! फार्सला अत्यावश्यक असलेल्या गतिमानतेला खीळ घालणारा हा विनोद आम्हा दोघांनाही मान्य नसावा म्हणूनच की काय, एखादे वेगळे नाटक करावे असे आमच्या मनात आले न् त्याचवेळी ' डबल गेम ' हे रहस्यनाट्य वाचनात आले.

हे नुसते रहस्यनाट्य नाही. यात भरपूर मिष्कीलपणा आहे.

It is a comedy of a suspense play!

रहस्यनाट्यप्रकाराची क्वचित् प्रसंगी टिंगल करण्याचाही उद्देश असावा. एखादद्दुसऱ्या प्रसंगात फार्सही डोकावतो. अगदी हसत-खेळत एक गुन्हा घडवण्याची योजना आखली जाते. मध्येच ती बारगळते. ते सावरण्याच्या नादात दोन वेगळेच गुन्हे घडतात. गुन्हे भयंकर असले, तरी हसत खेळतच घडतात आणि सरतेशेवटी विनोद नाहीसा होत जातो आणि नाटक एक वेगळीच कलाटणी घेते, नाटक रहस्यप्रधान आहे याची खात्री पटते.

मराठी प्रेक्षकांना रहस्यप्रधान नाटकांचं वावडं आहे असं म्हणतात. तेही पुनः एकदा तपासून घेतलेलं बरं! डिटेक्टिव्ह कादंबऱ्या, गूढकथा, हिन्दी भयपटांतून दिसणारं सस्पेन्सी वाङ्मय आपल्या मातीत पिकलेलं नसतं हे खरं आहे. तरीही त्याबद्दल एक जबरदस्त आकर्षण मात्र असतंच असतं!

Each & Every play is a thriller!

नाटक, मग ते कुठलंही असो, कुठल्याही विषयावर असो,–सामाजिक असो, ऐतिहासिक असो, फार्स असो– ते उत्कंठावर्धक असावेच लागते. प्रत्येक नाटकात पात्रांची तोंडओळख करून दिली जाते. परिस्थितीत थोडी हलवाहलव करून एक तिढा निर्माण केला जातो. काही नवीन पात्रांच्या आगमनाने तिढा वाढत जातो. गुंता तयार होतो. आणि तिसऱ्या अंकात येनकेन प्रकरेण हा गुन्ता सोडवला जातो.

रहस्यप्रधान नाटकातला वाढत जाणारा गुंता प्रेक्षकांना गुंग करतो. हुशार प्रेक्षक नाटकाच्या पुढचा विचार करतो. शेवट काय होणार? याबद्दल काही आडाखे बांधतो. काहीवेळा अपेक्षाभंगाने तो दुखावतो, तर कधी कधी सुखावतोही! मुख्य म्हणजे; हा प्रेक्षक सावध असतो. लहानसहान तांत्रिक चुका तर तो अजिबात खपवून घेत नाही. मराठी प्रेक्षकांना वावडं असावं ते सदोष तंत्राचं! विषयाचं अथवा प्रकाराचं नव्हे! आधुनिक तंत्रांपासून आपण त्यांना लांब ठेवतो ही आपली चूक...प्रेक्षकांची नव्हे! नाटक गुन्हेगारीवरचे असेल तर कायदेविषयक ज्ञान अत्यावश्यक ठरते. सर्वसामान्यपणे कुठलीही गुन्हेगारी; कायद्यातल्या लहानसहान पळवाटांवर आधारलेली असते. या सामाजिक कायद्यांचे उल्लंघन तर करायचे नाही, शिवाय रंगभूमीचेही कायदे पाळायचे! अशी दुहेरी भूमिका सर्व प्रेक्षकांच्या साक्षीने बजावायची, ही एक कसरतच आहे! त्यापेक्षा नको, त्या सस्पेन्सच्या वाटेला जाणेच नको! असा विचार निर्माते

आणि मंडळी करीत असावेत. (हो, अहो, साधे पिस्तुल जर वेळेवर उडलं नाही; तर आपलेच हसे व्हायचे!) ' डबल गेम 'सारख्या नाटकात रणजित–अभिजित अशा दुहेरी भूमिकेचं आव्हान असतं ते वेगळंच!

सस्पेन्स नाटकांना ' रिपीट ऑडियन्स ' मिळत नाही; म्हणून ती नाटकं ' घो घो ' चालत नाहीत, हे जरी खरं असलं, तरी तीही एक पळवाटच आहे. अन्यथा डबल गेमचा शतक महोत्सव अवघ्या पाच महिन्यांत झाला नसता.

अर्थात; असा प्रयोग बिनचूक व्हावा म्हणून यातल्या प्रत्येकाला दुहेरी भूमिका करावी लागते. लेखकाला दिग्दर्शकाची, दिग्दर्शकाला नटाची, नटांना प्रेक्षकाची, समीक्षकांची... डबल गेमच्या तालमीत प्रत्येकांनी तशी केलीसुद्धा. विशेषतः सौ. भक्ति बर्वे-इनामदारांनी वेळोवेळी ज्या बहुमोल सूचना केल्या, त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात माझी कुठलीही दुहेरी भूमिका नाही! संदीप कश्यप, पुरु बेर्डे यांच्यापेक्षा, पिस्तुलाचे बार वेळच्या वेळी उडवणाऱ्या घाडीगावकरांसह पडद्यामागच्या सर्व कलाकारांचे आभार मानले नाही, तर आमचा ' सिंगल गेम 'सुद्धा होणार नाही, केवळ म्हणूनच...आभार! सुहास, उदय, स्वाती, कडकोळ इ. कलाकार आणि निर्माते श्री. लोणे यांचे कसले आभार मानायचे? ती तर घरचीच मंडळी!

**प्रकाश बुद्धिसागर**
९ जानेवारी १९८८

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

स्थळ : रणजित परदेशी व निशा परदेशी ह्यांच्या बंगल्यातील दिवाणखाना. हा बंगला मढ-आयर्लॅण्डच्या जवळपास मार्वे रोडवर आहे. दिवाणखान्यात येण्या-जाण्यासाठी एक फ्रेन्च विंडो आहे; (प्लॅटफॉर्मवर) रंगमंचाच्या मध्यभागात; बाहेरून आत येण्यासाठी असलेला मुख्य दरवाजा मात्र प्रेक्षकांना दिसत नाही. प्रेक्षकांच्या उजवीकडे असलेल्या भिंतीत; गार्डनकडे किंवा विहिरीकडे जाण्यासाठी; भिंत तोडून एक पॅसेज तयार केलेला आहे. ह्या पॅसेजचा दरवाजासुद्धा प्रेक्षकांना दिसत नाही. घरातली माणसं ह्या पॅसेजचा उपयोग जाण्यायेण्यासाठी करतात. ह्या पॅसेजवर खालपर्यंत पडदे लावलेले आहेत. प्रेक्षकांच्या डाव्या बाजूला असलेला दरवाजा किचन-डायनिंग हॉलचा आहे. फ्रेन्च विंडोच्या उजव्या बाजूस असलेला पॅसेज पुढे बेडरूमकडे जातो ( बेडरूमसुद्धा प्लॅटफॉर्मवर आहे व त्याचाही दरवाजा प्रेक्षकांना दिसत नाही.)

दिवाणखाना अतिशय आकर्षक फर्निचरने सजवलेला आहे.रंगमंचाच्या उजवीकडे; पुढच्या भागात एक छोटा सोफा आहे. त्याच्या शेजारीच एक सीटी आहे. उजव्या भिंतीला लागून एक राईटिंग टेबल आहे. त्याला दोन-तीन ड्रॉवर्स आहेत. प्रेक्षकांच्या समोरची भिंत व डावी भिंत जिथं मिळते त्या कोपऱ्यांत आणखीन एक सोफा आहे. ह्या सोफ्याच्या दोन्ही बाजूला दोन साईड टेबल्स किंवा रॅक आहेत. त्यांत शोभेच्या वस्तू, फाईल्स व महत्त्वाची कागदपत्रं ठेवलेली आहेत. ह्याच साईड टेबलांवर काही मॅगेझीन्स, टेलिफोन व काचेचा ॲश-ट्रे आहे. ह्याच भिंतीच्या कोपऱ्यात; भिंतीच्या आत आकर्षक बार आहे. ह्या बारमध्ये परदेशी दारूच्या बाटल्या, पाण्याचा जग, आइस बकेट व ग्लासेस आहेत.

वेळ : सकाळची. नऊ वाजलेले आहेत.

पद्मा : लग्न करून तुम्ही ह्या घरात पाऊल ठेवलं, पण अवघ्या तीन महिन्यांत स्टेनलेस स्टीलच्या संसाराचं पितळ उघडं पडलं! तुम्ही तुमच्या आई-वडिलांना हे सगळं कळवलंय का?

निशा : कसं कळवणार? ते स्वर्गात असतात! एकुलता एक काका होता...पण तो सारखा माझ्यापासून लांब लांब उडायचा...

पद्मा : उडायचा की पळायचा?

निशा : उडायचा! ते स्वीस एअरमध्ये पायलट होते. पण विमान अपघातात तेही गेले! त्यांनी आपली सर्व मालमत्ता आणि रोख रकम माझ्या नावावर ठेवलीय...त्याशिवाय स्वीस एअरने काकाच्या अपघाती निधनाची नुकसान भरपाई म्हणून २५ लाख रुपये दिलेत. ते पैसेसुद्धा मी स्वीस बँकेतच ठेवले आहेत...

पद्मा : पण काय हो? रणजितसाहेब तुम्हाला भेटले कुठे?

निशा : ते मला दार्जिलिंगला भेटले. पाहताक्षणीच मी त्यांच्या प्रेमात पडले. झटपट विवाह कार्यालयात गेलो आणि लग्न करून मोकळे झालो.

पद्मा : मोकळे कुठे झालात; उलट अडकलात!...पण ते मुंबईहून दार्जिलिंगला कशासाठी आले होते?

निशा : दार्जिलिंगमध्ये चहाचा मळा विकत घ्यायचा होता. पण खिशात चहासाठी एक दिडकीही नव्हती (पद्मा रिॲक्ट करते.) हॉटेलमधून त्याची ब्रिफकेस चोरीस गेली होती. आणि त्यात पैसे, चेकबुक, कागदपत्रं होती.

पद्मा : मग त्यांचं हॉटेलचं बिल कुणी भरलं...?

निशा : मी भरलं. पण आता वाटतंय... ते बिल नव्हतं! त्यांच्या प्रेमात पडले त्याची पेनल्टी होती.

पद्मा : पण काय हो निशाताई, तुमच्याकडे भरपूर संपत्ती आहे. पैसा आहे... म्हणूनच रणजितसाहेबांनी झटपट लग्नाचा निर्णय घेतला; असं नाही वाटत तुम्हाला?

निशा : कुणास ठाऊक! पण मी हयात असेपर्यंत माझ्या नवऱ्याचा त्यावर अधिकार राहणार नाही; असं माझ्या काकांनी विलमध्ये लिहून ठेवलंय!

पद्मा : ही गोष्ट रणजितसाहेबांना माहीत आहे का?

निशा : होय! मीच सांगितलं त्याला. बस्स, त्या दिवसापासून ह्या माणसाचं डोकंच फिरलं...दारू–जुगारात वाटेल तसा पैसा उधळतोय.

पद्मा : तुमच्या जागी मी असते आणि माझे पैसे अभिजितने उधळले असते, तर मी सरळ अभिजितला—

निशा : अभिजित? कोण अभिजित?

पद्मा : [ लाजून ] अभिजित...तो दिल्लीला असतो...फरीदाबादच्या एका इले-

(पडदा उघडतो तेव्हा निशा परदेशी बेडरूममधून खाली उतरते. वय वर्षे तीस ते पस्तीस. तिनं नाईट गाऊन घातला आहे. पायात स्लीपर्स आहेत. खिडक्यांवरील पडदे उघडते. बाहेर डोकावून पाहते, नंतर घड्याळात. काही-तरी विचार करते व नंतर सोफ्यावर बसते व पेपर्स चाळते. काही क्षणांनंतर पद्मा किचनमधून दिवाणखान्यात येते. तिच्या हातांत चहाचा ट्रे आहे. पद्मा ह्या घरातील मोलकरीण आहे; पण एकूण तिच्या वागण्या-बोलण्या-वरून ती मोलकरीण वाटत नाही. तसेच ह्या घरातील मंडळीदेखील तिला नोकरांसारखी ट्रीटमेन्ट देत नाहीत. ती सुमारे तीस ते बत्तीस वर्षांची आहे. दिसायला स्मार्ट.)

पद्मा : गुड मॉर्निंग, निशाताई.

निशा : गुड मॉर्निंग, पद्मा.

पद्मा : चहा आणलाय तुमचा...साहेब रात्री आले नाही वाटतं; नाही...त्यांची गाडी दिसली नाही म्हणून विचारलं!

निशा : बायकोपेक्षा पत्त्यातल्या राण्या ह्या जुगाऱ्यांना जास्त आवडतात! त्या राण्या ह्यांना पैसे मिळवून देतात म्हणे! आज लायन्स क्लब; तर उद्या रोटरी क्लब! अगदीच कुठे जमलं नाही; तर आहेच एखादं सोशियल क्लब!
(डोअर बेल वाजते.)

पद्मा : साहेब आलेत वाटतं!
(पद्मा बाहेर जाते. निशा चहा घेते; व पेपर चाळते. काही क्षणांनंतर पद्मा प्रवेशते. तिच्या हातात काही पत्रे आहेत.)
पोस्टमन होता तो...'साहेबांचा काही निरोप आणलास का' विचारलं मी त्याला. त्यावर तो म्हणाला, 'आम्ही लेखी निरोप आणतो. तोंडी नाही.'
(हसते. टपाल निशाच्या हातात देते.)

निशा : (पत्र वरवरून पाहत) बॉम्बे टेलिफोन्सचं बिल आहे वाटतं! आणि हा बँकेचा रीमाइंडर...ही वकिलाची नोटी...

पद्मा : पण बँकेकडून कर्ज घ्यायची गरजच काय होती?

निशा : पद्मा; मी कंटाळलेय आता. रणजितबरोबर कसं काय जमवून घ्यायचं; मोठा प्रश्न पडलाय! [पॉझ] पद्मा... पूर्वीपासूनच त्यांना ह्या सवयी आहेत का?

पद्मा : वाईट सवयी लग्नानंतर लागल्या...तुम्ही पिणं आणि जुगाराबद्दल विचारताय ना . ?

निशा : तीन महिन्यांपूर्वी मला भेटलेला रणजित आणि आजचा रणज़ित ह्यात जमीन-अस्मानाइतका फरक आहे.

पद्मा : लग्न करून तुम्ही ह्या घरात पाऊल ठेवलं, पण अवघ्या तीन महिन्यांत स्टेनलेस स्टीलच्या संसाराचं पितळ उघडं पडलं! तुम्ही तुमच्या आई-वडिलांना हे सगळं कळवलंय का?

निशा : कसं कळवणार? ते स्वर्गात असतात! एकुलता एक काका होता...पण तो सारखा माझ्यापासून लांब लांब उडायचा...

पद्मा : उडायचा की पळायचा?

निशा : उडायचा! ते स्वीस एअरमध्ये पायलट होते. पण विमान अपघातात तेही गेले! त्यांनी आपली सर्व मालमत्ता आणि रोख रक्कम माझ्या नावावर ठेवलीय...त्याशिवाय स्वीस एअरने काकाच्या अपघाती निधनाची नुकसान भरपाई म्हणून २५ लाख रुपये दिलेत. ते पैसेसुद्धा मी स्वीस बँकेतच ठेवले आहेत...

पद्मा : पण काय हो? रणजितसाहेब तुम्हाला भेटले कुठे?

निशा : ते मला दार्जिलिंगला भेटले. पाहताक्षणीच मी त्यांच्या प्रेमात पडले. झटपट विवाह कार्यालयात गेलो आणि लग्न करून मोकळे झालो.

पद्मा : मोकळे कुठे झालात; उलट अडकलात!...पण ते मुंबईहून दार्जिलिंगला कशासाठी आले होते?

निशा : दार्जिलिंगमध्ये चहाचा मळा विकत घ्यायचा होता. पण खिशात चहासाठी एक दिडकीही नव्हती (पद्मा रिॲक्ट करते.) हॉटेलमधून त्याची ब्रिफकेस चोरीस गेली होती. आणि त्यात पैसे, चेकबुक, कागदपत्रं होती.

पद्मा : मग त्यांचं हॉटेलचं बिल कुणी भरलं...?

निशा : मी भरलं. पण आता वाटतंय... ते बिल नव्हतं! त्यांच्या प्रेमात पडले त्याची पेनल्टी होती.

पद्मा : पण काय हो निशाताई, तुमच्याकडे भरपूर संपत्ती आहे. पैसा आहे... म्हणूनच रणजितसाहेबांनी झटपट लग्नाचा निर्णय घेतला; असं नाही वाटत तुम्हाला?

निशा : कुणास ठाऊक! पण मी ह्यात असेपर्यंत माझ्या नवऱ्याचा त्यावर अधिकार राहणार नाही; असं माझ्या काकांनी विलमध्ये लिहून ठेवलंय!

पद्मा : ही गोष्ट रणजितसाहेबांना माहीत आहे का?

निशा : होय! मीच सांगितलं त्याला. बस्स, त्या दिवसापासून ह्या माणसाचं डोकंच फिरलं...दारू-जुगारात वाटेल तसा पैसा उधळतोय.

पद्मा : तुमच्या जागी मी असते आणि माझे पैसे अभिजितने उधळले असते, तर मी सरळ अभिजितला—

निशा : अभिजित? कोण अभिजित?

पद्मा : [ लाजून ] अभिजित...तो दिल्लीला असतो...फरीदाबादच्या एका इले-

क्ट्रॉनिक कंपनीत तो टी. व्ही. टेक्निशियन म्हणून सर्व्हिसला आहे. थोडे-फार पैसे साठवून तिथंच जागा घ्यायचा विचार आहे.

निशा : अरे वाह! म्हणजे लग्न ठरवलंय तुमचं...चला; सकाळी सकाळी आनंदाची बातमी ऐकायला मिळाली.

पद्मा : नुसतं ऐकत काय बसलात? चहा थंड झालाय तुमचा. थांबा मी दुसरा करून आणते.

[ ती किचनमध्ये जाते. ]

(पद्मा आत गेल्यानंतर; निशा हातात असलेल्या इतर पत्रांकडे पाहते. त्यांतील एका पत्राकडे तिचं लक्ष वेधलं जातं...त्या पत्रावरील नाव व पत्ता वाचते...पत्र उलटं करून; पाठवणाऱ्याचं नाव व तिथल्या पोस्टऑफिसचा स्टॅम्प पाहाते.)

निशा : पद्मा...

पद्मा : आले हं...निशाताई...

निशा : अगं, तुझं पत्र आहे...

पद्मा : माझं पत्र? (बाहेर येते) माझं पत्र इथे कसं?

निशा : दिल्लीहून आलंय...तुझ्या अभिजितचं पत्र आहे...पण त्यावर माल तिहार जेलचा शिक्का आहे.

पद्मा : तिहार जेल? बापरे...!

निशा : तिहार जेलमध्ये टेक्निशिअन आहे वाटतं...?

पद्मा : तो ह्या पत्त्यावर कधीच पत्र पाठवीत नाही. नेमकं हेच पत्र इथे पाठवावं? निशाताई, प्लीज...या पत्राच्या संदर्भात रणजितसाहेबांना काहीसुद्धा कळता कामा नये...प्लीज...

निशा : ही तुझी वैयक्तिक बाब आहे.

पद्मा : पण तिहार जेलमधून मला हे पत्र आलंय हे जर रणजितसाहेबांना कळलं, तर ते—

निशा : कळलं तर कळलं...तो काय लायकीचा आहे हे दुनियेला माहीत आहे.

पद्मा : पण तरीही ह्या पत्रातलं एक अक्षरही त्यांना कळता कामा नये.

निशा : का?

पद्मा : त्याचं काय आहे; आपले साहेब माझ्या अभिजितला चांगले ओळखतात. पण माझे अभिजितशी संबंध आहेत हे त्यांना माहीत नाहीए...तुम्ही मला वचन द्या. ही गोष्ट तुम्ही रणजित साहेबांना...

निशा : सांगणार नाही...पत्र तर वाच...

(कव्हर उघडून पद्मा पत्र काढते...पत्र वाचत असताना नकळत तिच्या हातातून कव्हर जमिनीवर पडते. ज्यावर निशाचंही लक्ष जात नाही...पत्र

वाचत असताना पद्माच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसतात.)

पद्मा : निशाताई, आणखी एक आनंदाची बातमी सांगू? येत्या २६ जानेवारीला अभिजितच्या शिक्षेची मुदत संपणार होती; पण त्याची चांगली वागणूक पाहून त्याला उद्याच तुरुंगातून मुक्त करणार आहेत. (किंचित काळजीच्या सुरात) निशाताई, ही गोष्ट तर साहेबांना मुळीच कळता कामा नये... साहेब येण्यापूर्वी मला निघायला हवं...नाहीतर ते मला अडवतील. जाऊ देणार नाहीत...

निशा : जाऊ देणार नाहीत? तुझ्या प्रियकराला भेटायला तो कोण तुला अडवणारा?

पद्मा : माझा प्रियकर म्हणजे, अभिजित हा... (थांबते.)

निशा : बोल पद्मा, थांबलीस का? कोण आहे हा अभिजित?
( बाहेर कार पार्क होण्याचा आवाज ऐकू येतो )

पद्मा : साहेब आलेत– प्लीज़, तुम्ही त्यांना त्यातलं काहीही सांगू नका—
(तावडतोब किचनमध्ये जाते. निशा अवाक होऊन ती गेलेल्या दिशेकडे पाहते. जमिनीवर पडलेल्या एनव्हलपवर आता तिचं लक्ष जातं. कव्हर उचलते... व सोफ्यावरील कुशन्सखाली लपवून ठेवते. ह्याच वेळेस दार उघडून रणजित प्रवेशतो. वय वर्षे ३६ ते ४०, देखणं व्यक्तिमत्त्व. त्याने अतिशय उंची मॉड ड्रेस घातलेला आहे. दारू व जागरणामुळे त्याचा चेहरा निस्तेज वाटत आहे. त्याचबरोबर दारूचा किंचित इफेक्ट अजूनही आहे.)

रणजित : गुड मॉर्निंग, निशा डार्लिंग. मला वाटलं तू बेडरूममध्ये असशील...

निशा : तू असा लांब लांब का पळतोस माझ्यापासून? बेडरुमची ॲलर्जी आहे का?

रणजित : मला तुझी ॲलर्जी आहे.

निशा : मग लग्न कशाला केलं?

रणजित : तुझ्याशी कोणी केलंय लग्न? सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीशी लग्न केलंय मी...

निशा : आज दोन ऑक्टोबर आहे का? नाही...तोंडातून सत्य बाहेर पडलं—रात्रभर होतास कुठे?

रणजित : मित्रांबरोबर. त्यांनी फारच आग्रह केला...तुझी समजूत मी काढू शकतो; कारण तू समजूतदार आहे... पण ते लेकाचे–जाऊ दे दलिंदर साले,... त्यांना नाही कामधंदा...तुझं चेकबुक कुठं आहे?

निशा : अच्छा! म्हणजे चेक हवा होता म्हणून तू आलास...नाहीतर.

रणजित : आलोच नसतो...एक चेक लिही... [ निशा जागची हलत नाही. ] तुला चेष्टा वाटतेय का? अगं, बाहेर माणूस उभा आहे...पैशासाठी. एखाद्याला

किती वेळ ताटकळत ठेवायचं...[ बाहेर पाहात ] तोही लेकाचा माझ्याच भेटला...मी काय पळून जातोय का ? आणि पळायचं तरी कशाला ? घरात सोन्याची खाण असताना ? (वळून पाहतो) अगं, हे काय, मघापासून मी कोकलतोय, ऐकू येत नाहीए का ?

निशा : ऐकतेय मी...यापुढे तुझ्यासाठी माझ्या तिजोरीचे दरवाजे कायमचे बंद झालेत समज.

रणजित : डोकं फिरवू नकोस. चेकबुक कुठे आहे ?
[ घरातील वस्तू व ड्रावर्स चेक करतो. ]

निशा : चेकबुक मी लपवून ठेवलंय...सापडणार नाही तुला.
(बार-कपबोर्डकडे येतो. निशा ताडकन उठते व त्याचा मार्ग अडवते.)
(तो निशाचा हात पिळतो व तिला एका कोपऱ्यात ढकलून देतो. निशा किंचाळते. पद्मा आतून बाहेर धावत येते.)

पद्मा : साहेब,—

रणजित : पद्मा, तू आत जा...माझं डोकं फिरलं की, मी फार वाईट माणूस आहे.
(ती जायला वळते.)
ऐक; बाहेर माणूस उभा आहे त्याला आत पाठव. म्हणावं; तुमचा चेक तयार आहे. [ पद्मा निशाकडे पाहत बाहेर जाते. ] चेक तयार असल्याचा निरोप पोचलाय...लिहायला घे चेक...बाहेरच्या माणसासमोर शोभा नकोय मला. तो येण्यापूर्वी मला चेक हवाय...नाहीतर पश्चात्तापाची पाळी येईल तुझ्यावर...आय मिन इट, निशा...

निशा : रणजित...मी पुन्हा कलकत्त्याला जाण्याचा निर्णय घेतलाय.

रणजित : शक्यच नाही...

निशा : आणि तिथल्या कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज करणार आहे...

रणजित : निशा, स्वीस बँकेचं शिखर सर करण्यापूर्वी या गोष्टी मी सहजासहजी घडू देणार नाही. त्यानंतर ह्या घरातून तुझी पालखी वाजत गाजत, माझ्या खांद्यावरून थेट राजघाटापर्यंत न्यायची आहे मला...

निशा : पैशासाठी तू माझे प्राणसुद्धा घेशील.

रणजित : सध्या मी आर्थिक अडचणीत आहे ..यू वोण्ट बिलीव्ह, तो माणूस पैशांसाठी माझे प्राण घेणार होता. त्याच्या हातून मरण्यापेक्षा मी आत्महत्या करीन...पण आत्महत्या तरी कशासाठी ? तू असताना...

निशा : छान जमतं तुला ..कॉमेडी आणि मेलोड्रामा एकाच वेळी...

रणजित : थँक्यू [ बार-टेबलाकडे जातो व व्हिस्कीचा ग्लास भरतो. बाहेरून मोठमोठ्याने बोलणं ऐकू येतं. ] आला दळिंदर लेकाचा...
(मेन डोअर उघडून पद्मा आत येते. तिच्या पाठोपाठ एक माणूस येतो )

या या सुब्रह्मण्यम्, आंत या...

(सुब्रह्मण्यम्– वय वर्षे ४५ ते ५०, उंच व मध्यम शरीरयष्टी. देखणं व्यक्तिमत्त्व. त्याच्या हातात छोटीशी ब्रीफकेस आहे.)

सुब्रमण्यम् : आय होप, आय ॲम नॉट डिस्टर्बिंग यू.

रणजित : नॉट ॲट ऑल...तुमची ओळख करून देतो. ही माझी बायको– निशा रणजित परदेशी...(निशाला) मिस्टर सुब्रमण्यम्– माझे जवळचे स्नेही. ह्यांना मी पैसे देणे लागतो.

सुब्रमण्यम् : देशील रे ! दोन मिनिटं बसू दे तरी. आता इथपर्यंत आलोय तर पैसे घेतल्याशिवाय थोडाच जाणार आहे ! [निशाला] प्रत्यक्षात आज प्रथमच आपली भेट होतेय. तुमचे मिस्टर मात्र नेहमी तुमचा...

निशा : उल्लेख करतात...सोन्याची अंडी देणारी कोंबडी...करेक्ट ? एक गोष्ट ध्यानात ठेवा, मिस्टर सुब्रह्मण्यम...रणजितसाठी आता ही कोंबडी खुडूक झालीय. यापुढे त्याचं कर्ज तो फेडेल– ओ के...?

सुब्रमण्यम् : रणजित...?

रणजित : मस्करी करतेय ती...

सुब्रमण्यम् : पण एवढी अमाउंट तू आणणार कुठून...?

रणजित : चेकबुक कुठेय ?

निशा : मी माझं चेकबुक लपवून ठेवलंय...

(रणजित रागाने तिच्या अंगावर धावून जातो.)

थांबलास का ? उचल ना तुझा हात...मला तेच तर हवंय...माझा नवरा दारू पिऊन मारझोड करतो...माझा छळ करतो...आणि हे इथं हजर असलेले माझे दोन साक्षीदार...

[पद्मा आणि सुब्रमण्यमकडे बोट दाखविते)

घटस्फोटाचं काम सरळ आणि सोपं झालंच म्हणून समज...

सुब्रमण्यम् : रणजित, अरे बाबा, तुला घटस्फोट मिळेल तेव्हा मिळेल... पण मला जर आज पैसे मिळाले नाहीत, तर... माझी बायको माझ्यापासून घटस्फोट घेतल्याशिवाय राहणार नाही.

रणजित : तुम्ही एक वडीलधारं माणूस म्हणून इथल्या परिस्थितीचा विचार करा, मिस्टर सुब्रमण्यम !

सुब्रमण्यम् : सध्या माझ्या डोक्यात एकच विचार आहे, माझे पैसे...

रणजित : दोन मिनिटं थांबा. तुमचा चेक तयार होतोय. (निशाला) चेकबुक कुठाय ? (रागाने तो निशाकडे पाहतो व तिच्या थोबाडीत मारणार इतक्यात– )

पद्मा : मारू नका त्यांना. चेकबुक त्या पेंटिंगच्या मागे आहे.

रणजित : आधी सांगायला दातखिळी बसली होती का ?

(पेंटिंगच्यामागून तो चेकबुक काढतो. टेबलावरनं पेन घेतो. पेन बळजबरीने तिच्या हातात देतो.)

नाऊ लेडीज ॲण्ड जेंटलमन... मेन्टेन पिन ड्रॉप सायलन्स! काही क्षणांतच माझ्या धर्मपत्नीच्या बँक बॅलन्समधला काही अंश मिस्टर सुब्रमण्यमच्या खात्यात जमा होणार आहे. मिस्टर सुब्रमण्यम, तुमचा फिगर सांगा.

सुब्रमण्यम : काल रात्री जुगारात हरलास तेवढेच की... मग मागचं पुढचं. . .सगळंच क्लीअर करणार आहेस ?

रणजित : कंप्लीट क्लीअर करून टाकतोय. एखाददुसऱ्या शून्यानं काय फरक पडणार आहे... ?

सुब्रमण्यम : (खिशातून डायरी काढून टोटल करीत...) चाळीस हजार...

रणजित : ( निशाला ) ऐकलंस का... चाळीस हजार... चारा पुढे फक्त चार शून्यं.

( निशा चेकवर अमाउंट लिहायला सुरुवात करते... रणजित सुटकेचा श्वास घेतो. अचानक ती लिहायची थांबते व पेन रागाने लांब भिरकावून देते व चेक फाडून टाकते, त्यामुळे रणजित भयंकर संतापतो व जोराने आपला हात टेबलावर आपटतो. टेबलावरील ॲश ट्रे ची धार त्याच्या हाताला लागते... हातातून रक्त येतं. )

पद्मा : साहेब, हे काय केलंत तुम्ही ? रक्त येतंय हातातून... !

[ पद्मा टेबलावरून एखादं नॅपकीन किंवा हातरुमाल रणजितला देते... रणजित ते हाताला गुंडाळतो. ]

रणजित : (निशाकडे रागाने पाहतो) मिस्टर सुब्रमण्यम, आय ॲम सॉरी...येत्या ४८ तासांत तुमचे पैसे चुकवले जातील; अशी प्रॉमिसरी नोट मी तुम्हाला लिहून देतोय. प्लीज अंडरस्टॅण्ड मी.

सुब्रमण्यम् : ४८ तास, म्हणजे दोन दिवसांत !

रणजित : गोव्यात आमची फार मोठी प्रॉपर्टी आहे— ती प्रॉपर्टी मॉरगेज ठेवून मी तुमचं कर्ज फेडीन. मला फक्त तिथे जाऊन येण्याइतका अवधी हवा. आय विल गो बाय प्लेन ॲण्ड कम बाय प्लेन...

सुब्रमण्यम् : ४८ तास ही डेड लाईन. लक्षात ठेव.

रणजित : प्रॉमिसरी नोटमध्ये ४८ तासांची मुदतही नमूद करतो, मग तर झालं ? चला, आपण वर जाऊन पेपर्स तयार करूया. मला माझी बॅगही तयार करावी लागेल. आय मिन, पणजीला निघायची तयारी करतो.

( सुब्रमण्यम व रणजित वर स्टडीमध्ये जातात. )

पद्मा : [ तिच्याजवळ जाऊन ] सॉरी निशाबाई, चेकबुकचं मी सांगणार नव्हते. पण त्यांनी तुम्हाला मारझोड करू नये; म्हणून नाइलाजानं सांगावं लागलं...

काल साफसफाई करत होते तेव्हा माझं लक्ष गेलं तिकडं—

निशा : [ काहीतरी स्ट्राईक झाल्याप्रमाणे ] पद्मा, माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस तू.

पद्मा : कुठला प्रश्न ?

निशा : तिहार जेलमधून येत असलेल्या तुझ्या अभिजितला भेटायला तू जाणार आहेस, हे रणजितला का कळता कामा नये ?

[ पद्मा काहीच बोलत नाही. ]

कोण आहे हा अभिजित ? कोणत्या अपराधासाठी त्याला तुरुंगात जावं लागलं ?

पद्मा : माझा अभिजित निरपराध आहे. त्याला तुमच्या रणजितमुळे तुरुंगात जावं लागलं...

निशा : काय !

पद्मा : दिल्लीच्या एका बँकेच्या दरोड्यात रणजितसाहेबांचा हात होता.

निशा : बँकेच्या दरोड्यात ?

पद्मा : होय ! पण रणजितच्या ऐवजी पोलिसांनी अभिजितला अटक केली.

निशा : म्हणजे ? अभिजित खुलासा न करता गप्प बसला ?

पद्मा : अभिजित बळीचा बकरा झाला.

निशा : पण कशासाठी ?

पद्मा : रणजितसाठी तो आयुष्यभर त्याग करत आला.

निशा : त्याग ? कारणाशिवाय ?

पद्मा : अभिजित...हा रणजितचा भाऊ आहे.

निशा : भाऊ ? पण रणजितला भाऊ आहे कुठे ?

पद्मा : आहे... अभिजित रणजितचा सख्खा भाऊ आहे.

निशा : पण रणजित कधी मला बोलला नाही.

पद्मा : निशाला ही गोष्ट कळता कामा नये; असं त्यांनी मला बजावून सांगितलं होतं...

निशा : (स्वगत–अवाक झाल्याप्रमाणे) अभिजित रणजितचा सख्खा भाऊ ?

पद्मा : रणजितपेक्षा एक वर्षाने लहान आहे तो. एखाद्या मोठ्या वृक्षाच्या सावलीत, त्याच्या धाकात लहानाचा मोठा झाला. आपल्या इच्छेप्रमाणे अभिजितचा वापर करण्यात आला.

निशा : [ शून्यात पाहात असल्याप्रमाणे] माझा विश्वास बसत नाहीए...पण काही-तरी पुसटसं आठवतंय...येस...इरॉसला आम्ही सिनेमा पाहायला गेलो होतो... तेव्हा एक बाई रणजितला विचारत होती... ' हाउ इज युवर ब्रदर...? ' एकदा...बरोबर...अभिजितच्या नावाचं पत्रसुद्धा आलं होतं

...आणि मागच्या आठवड्यात तर; चक्क अभिजितसाठी फोन आला होता. त्यावर मी विचारलंदेखील...तुम्हाला रणजित पाहिजे की अभिजित...? ...बरोबर...अभिजित हा रणजितचा भाऊच आहे.

पद्मा : जो या क्षणाला तुमच्या रणजितमुळे तुरुंगात आहे-- तुम्हाला साहेब छळतात ना; तसंच ते अभिजितला छळायचे, म्हणून तो कंटाळून दिल्लीला गेला. तर ही स्वारी (रणजित) तिथं दरोडा टाकायला गेली. मुंबईत काय बँका नव्हत्या...? पण माझ्या अभिजितला अडकवायचा होता ना! अभिजितच्या सुटकेची बातमी रणजितला का कळू द्यायची नाही; याचं उत्तर सापडलं ना तुम्हाला?

निशा : आज दुपारच्या फ्लाइटने तू दिल्लीला जा. अभिजितला भेट. परत इथे येऊ नका. जगातल्या कुठल्याही कोपऱ्यात तुमचा संसार थाटा--माझ्याकडून तुला हवी ती मदत मिळेल!

पद्मा : कुणीतरी आपल्या पाठीशी उभं आहे म्हटल्यावर अभिजितचा आत्मविश्वास वाढेल. त्याच्यावर फार मोठा अन्याय झालाय. स्वतःच्या भावासाठी उद्या हा फाशीसुद्धा जाईल.

निशा : पद्मा, स्वतःच्या भावासाठी; म्हणजे कळलं नाही...कायदा गाढव असतो; पण तुम्ही समजताय तेवढा गाढव नाही...

पद्मा : अहो, हे रणजित साहेब अभिजितला भेटायला म्हणून दिल्लीला गेले. त्याचं आयडेंटिटीकार्ड चोरलं. नंतर बँक लुटून तो पळून गेला. पण त्यापूर्वी बँकेच्या आवारात अभिजितचं कार्ड फेकून दिलं...त्यावर नाव-पत्ता-फोटो सगळंच होतं...अभिजितला अटक झाली तेव्हा तो कामावर होता.

निशा : अगं, पण तुरुंगात टाकण्यापूर्वी कोर्टात केस चालली असेल. ओळखपरेड झाली असेल. आय विटनेसनी आरोपीला ओळखायला हवं.

पद्मा : त्या दरोड्यात ह्याच माणसाचा हात होता, असं प्रत्येकाने अभिजितच्या बाबतीत सांगितलं.

निशा : असं होणंच शक्य नाही.

पद्मा : (अचानक स्ट्राईक झाल्याप्रमाणे) एक महत्त्वाचा मुद्दा सांगायलाच विसरले...

निशा : महत्त्वाचा मुद्दा?

पद्मा : अभिजित आणि रणजितमध्ये काहीएक फरक नाही.

निशा : फरक नाही म्हणजे?

पद्मा : दिसायला दोघे सारखेच आहेत.

निशा : काय!

पद्मा : म्हणजे, कोण अभिजित आणि कोण रणजित हे कोणी ओळखू शकणार

नाही; इतकं साम्य आहे दोघांत.

निशा : जुळे भाऊ आहेत का ते...?

पद्मा : दोघांत साम्य असायला ते जुळेच असायला पाहिजेत, असा नियम आहे का?

निशा : [ट्रान्समध्ये गेल्याप्रमाणे] अभिजित आणि रणजित...
(तिच्या डोक्यात एखादी भयंकर योजना आकार घेत आहे.)
रणजितचा भाऊ अभिजित – त्याच्याच सारखा – म्हणजे रणजितची डुप्लीकेट... मार्व्हलस . फॅन्टास्टीक... पद्मा, प्लीज माझं एक काम करशील?

पद्मा : हुकूम करा बाईसाहेब, आता आपलं ब्रॅकेट झालंय. (हात मिळवते)
(वरून रणजित व सुब्रह्मण्यमच्या बोलण्याचा आवाज ऐकू येतो. पद्मा तेथून लांब जाते, एखाद्या वस्तूवरून फडका मारते व हळूच किचनमध्ये जाते. रणजितच्या पाठोपाठ सुब्रह्मण्यम् खाली उतरून दिवाणखान्यात प्रवेश करतात. रणजितने आता आपले कपडे–चेंज केलेले आहेत. शक्य तो सूट असावा. त्याच्या हातात छोटीशी सूटकेस व पाउच आहे. सुब्रह्मण्यम् आपल्या हातातले पेपर्स–प्रॉमिसरी नोट–स्वतःच्या ब्रीफकेसमध्ये ठेवतात. रणजितच्या हातावर बॅन्डेज बांधलेले आहे.)

सुब्रह्मण्यम् : चला, ऑल इज वेल; दॅट एण्डस वेल! प्रत्येक क्षण मोलाचा आहे. तेव्हा आय विश यू गुडलक!

रणजित : थॅक्यू··· आय नीड इट! (निशाला) निशा डार्लिंग... हा हात नुसता काचेनेच चिरला गेलेला नाहीय... आर्थिकदृष्ट्या सुद्धा तो आता लुळा पडलाय!

सुब्रमण्यम् : काचेनं धनरेषाच कट झाली आहे. (हसतो) मिसेस रणजित .. आय ॲम सॉरी. माझ्या उपस्थितीमुळे तुमच्यात बेबनाव झाला... त्याबद्दल मी दिलगीर आहे.

निशा : तुम्ही का वाईट वाटून घेताय... अहो, हा माणूस दारू प्यायल्यानंतर स्वतःला सावरू शकत नाही... त्याच्या अंगात जणू राक्षसच संचारतो. पैसे मागायची ही काय पद्धत झाली? जुगारात पैसे हरलास आणि नम्रता गहाण ठेवून आलास?

सुब्रमण्यम् : यू आर राईट! (रणजितला) पुढचे ४८ तास तरी नम्रपणे वाग...

रणजित : डार्लिंग, ट्राय टू अंडरस्टॅण्ड मी.. (ती तोंड फिरवते.) ठीक आहे. गोव्याहून आल्यानंतर मी तिची समजूत काढीन... ओ. के.

निशा : सौदा जपून कर... विचार करून...आणि काय होतंय ते मला फोन करून कळव.

रणजित : आय विल डेफिनेटली फोन यू.

(स्ट्राईक झाल्याप्रमाणे)

अरे हो, विसरलोच मी...नाक्यावरचा तो पास्कल वाईनशॉपवाला उद्या इथं येईल. त्याला ५००० रुपये द्यायचे आहेत... (निशा रागाने पाहाते) तुझ्याकडे मी नाही मागत पैसे; आज रात्री किंवा उद्या सकाळी सुब्रह्मण्यम तुला पाच हजार रुपये आणून देतील, ते पैसे पास्कलला द्यायचे.

सुब्रह्मण्यम् : काय ?

रणजित : ४० हजारांऐवजी मी ४५ हजार रुपये देईन तुम्हाला; काय ?

सुब्रह्मण्यम् : (निशाला) पैसे कधी आणून देऊ तुम्हाला ? नाही– म्हणजे तुम्ही कुठे बाहेर...

निशा : केव्हाही या. मी घरीच आहे.

सुब्रह्मण्यम् : ठीक आहे. उद्या येतो मी.

निशा : पास्कल येण्यापूर्वी आणून द्या म्हणजे झालं !

रणजित : सुब्रह्मण्यम्–

सुब्रह्मण्यम् : डोण्ट वरी माय बॉय... (रणजित शेक-हॅण्ड करतो)

रणजित : (त्याच्या हातावरची जखम दाखवीत) ऑह माय गॉड–

सुब्रह्मण्यम् : रणजित, सध्या हे बॅण्डेज तसंच राहू दे ! पण उद्या एखाद्या डॉक्टरला कन्सल्ट कर. घाव मोठा आहे.

रणजित : खरंच माझी धनरेषा कट झालीय का ?

सुब्रह्मण्यम् : धनरेषा आणि आयुष्यरेषेच्या मधोमध घाव बसलाय. (हसतो) बरं, तुमची प्रॉपर्टी मॉरगेज ठेवायला त्रास तर होणार नाही ना ?

रणजित : आमची प्रॉपर्टी पणजीत आहे. इटस अ हार्ट ऑफ गोवा. मोक्याच्या ठिकाणी आहे. त्याशिवाय सगळेच पेपर्स क्लीअर आहेत हो !

सुब्रह्मण्यम् : ते खरं आहे. पण कायद्याप्रमाणे; तुला एक नोऑब्जेक्शन लेटर घ्यावं लागेल. तुझ्या भावाची संमती घेतली पाहिजे.

(वरील वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच रणजित सुब्रह्मण्यमच्या तोंडावर हात ठेवतो व त्यांना गप्प करतो. पण भावाचा उल्लेख केल्यामुळे निशा मात्र; प्रेक्षकांच्या लक्षात येईल अशा पद्धतीने, रिॲक्ट करते. पण इतर पात्रांना मात्र कळू देत नाही.)

रणजित : भावाची संमती ? यू मीन माझ्या चुलत भावाची... ? अहो, ही वडिलोपार्जित प्रॉपर्टी थोडीच आहे ? ही फक्त माझ्या वडिलांची प्रॉपर्टी आहे. ज्यावर सध्या फक्त माझा मालकी हक्क आहे. कारण ओल्डमॅन इज ऑलरेडी डेड... !

सुब्रह्मण्यम : अरे वाःह !

(आतून पद्मा येते)

रणजित : पद्मा, मॅडमवर लक्ष ठेव. त्रास देऊ नकोस तिला. पैसे लागले तर मॅडमकडून घे. माझ्याकडे विष खायलाही पैसे नाहीत.

निशा : रणजित, तुझ्याकडे अजिबात पैसे नाहीत ? मग तू गोव्याला जाणार कसा ? बघ हं...विमानात विदाउट तिकीट प्रवास करू नकोस.

रणजित : गरीब नवऱ्याची मस्करी करतेस का ? गोव्याला जाण्यायेण्याचा खर्च सुब्रह्मण्यम् करणार आहेत.

सुब्रह्मण्यम् : (दचकून) काय ?

रणजित : काळजी करू नका. ही नवग्रहाची आंगठी मी तुमच्याकडे गहाण ठेवतो.

सुब्रह्मण्यम् : पैसे असेच घेऊन जा. पण ही अंगठी नको ! खड्यांची पॉवर आता संपत आलेली आहे.

रणजित : बाय, डार्लिंग...चला सुब्रह्मण्यम्.

सुब्रह्मण्यम् : (निशाला) उद्या पैसे घेऊन येतो.

निशा : अवश्य या ! (सुब्रह्मण्यम् व रणजित बाहेर जातात.)
पद्मा, क्वीक...बाहेर त्यांचं काय बोलणं चाललंय... ?
(पद्मा फ्रेन्च विंडोकडे जाते व बाहेर डोकावून पाहते.)

पद्मा : रणजितसाहेब त्या माणसावर चिडलेत...तो माणूस सॉरी म्हणाला....गाडीत बसले आता. तो मागे बसत होता; साहेबांनी त्याला पुढे बसवलं...गाडी स्टार्ट होत नाहीए...झाली...

निशा : ते जातील. तू इकडे ये आता.

पद्मा : साहेब त्या माणसाला कशाला झापत होते कळलं नाही.

निशा : माझ्या समोर त्याच्या भावाचा उल्लेख केला म्हणून. माझ्यापासून ती गोष्ट लपवून ठेवली आहे ना ?

पद्मा : चला, कधी एकदा उद्याचा दिवस उजाडतो असं झालंय.

निशा : पद्मा, दोन दिवस रणजित मुंबईत नाही, तेव्हा तुझ्या अभिजितला सरळ इथंच घेऊन ये.

पद्मा : इथं... ? नको नको !

निशा : तुला मी हवी ती मदत करीत...आय मीन; आर्थिक मदत करायला तयार आहे...

पद्मा : पण अभिजितला भेटून तुम्ही करणार काय ?

निशा : मला तो इथे फक्त १५ मिनिटांसाठी हवा आहे.

पद्मा : पण अभिजित...

निशा : मी आग्रह केलाय म्हणून सांग...त्यासाठी मी तुला २५ हजार रुपये देईन.

पद्मा : २५ हजार... ?

निशा : पद्मा, येशू ख्रिस्ताने जगाला एक तत्त्वज्ञान सांगितलंय...तुमच्या एका गालावर चपराक मारल्यानंतर दुसरा गाल पुढे करा...का माहीत आहे तुला ? माणूस पहिली थप्पड खातो तेव्हा बेसावध असतो...पण दुसऱ्या खेपेस तो सावध होतो. शत्रूची चाल त्याला माहीत असते...त्याचा डाव उलटून टाकायला तुमच्याकडे अवधी असतो.

पद्मा : ( स्तब्ध होते. ) म्हणजे एखादा भयानक डाव खेळायचा विचार आहे वाटतं...?

निशा : डाव नाही. जुगार...देवाण घेवाण तुझ्या–माझ्यात आणि सौदा मात्र रणजितचा...(हात मिळवते आणि अंधार होतो.)

—: प्रवेश पहिला समाप्त :–

## प्रवेश : दुसरा

(वेळ– दुसऱ्या दिवसाची सकाळ. स्थळ– तेच. )

( निशा बेडरूममधून खाली उतरते. तिने आता वेगळा नाईट गाऊन घातला आहे. फ्रेंच विंडोवरील पडदे उघडते. बाहेरून सूर्यप्रकाश येतो. ती तिथेच उभी राहून बाहेर पाहात असते... घड्याळात पाहते. इतक्यात... टेलिफोनची बेल वाजते. )

निशा : ( फोन उचलून ) हॅलो... येस... सिक्स-सेव्हन...टू वन फोर सिक्स वन ? दॅटस राईट. ट्रंक कॉल आहे ?...कुठून ? पणजीहून...? यस...यस आय विल होल्ड इट ऑपरेटर...कोण ?...रणजित...? बोल...मी निशा बोलतेय...प्रॉपर्टीचं काम झालं का ?...पार्टी मिळाली ?...चला; बरं झालं. काय ?...मी मजेत आहे...काही नाही...कोण ?...पद्मा...तिला मी बाहेर पाठवलीय...तिच्याशी बोलायचं होतं ? बरं बरं, मी सांगेन हं तिला माझी काळजी घ्यायला...

(बाहेर टॅक्सी थांबल्याचा आवाज...निशा रिसीव्हर कव्हर करते...पद्मा आत येते. तिने चांगले कपडे घातलेले आहेत. )

निशा : ( फोनवर बोलते) काय म्हणालास...? उद्याच्या फ्लाईटने येतो आहेस ? ये...ये...मी तुझी वाट पाहीन...बाय...
(फोन खाली ठेवते. )

पद्मा : निशाताई,—

निशा : अभिजित कुठे आहे ? तुरुंगातून सुटला की नाही ?

पद्मा : तो सुटला; पण...
निशा : तो इथे का नाही आला?
पद्मा : त्याचं काय आहे...
निशा : तू मला वचन दिलं होतंस, पद्मा...
पद्मा : पण त्याला भीती वाटतेय...
निशा : रणजितची? पण तो घरात आहे कुठे? आता तुझ्या समोर त्यानं पणजीहून फोन केला होता...अभिजित मला इथे हवा आहे...कुठं आहे तो...
पद्मा : तो टॅक्सीतच बसला आहे.
निशा : (सुटकेचा श्वास घेत) माझ्या हृदयाचा ठोकाच चुकला होता. जा...त्याला घेऊन ये...
पद्मा : (फ्रेंचविंडोकडे जाते व बाहेर डोकाऊन) अभिजित... अभिजित, तो नाहीए घरात...ये पटकन...अरे, इकडे-तिकडे चोरासारखा बघू नकोस... आत ये...

(पद्मा मेन डोअर उघडते. काही क्षणांतच अभिजित आत येतो. अभिजित व रणजितमध्ये कमालीचं साम्य आहे. त्याने चष्मा घातला आहे. हेअर स्टाईलमात्र रणजितहून वेगळी आहे. त्याने अतिशय साधा पोषाख घातला आहे व पायांत चपला आहेत. त्याच्या हातात एक सुटकेस आहे. तो घरात चारही बाजूला पाहतो. व अधूनमधून निशाकडे.)

पद्मा : अभिजित, ही तुझी वहिनी...निशा...आय मीन निशाताई.
निशा : नमस्कार भावोजी. तुम्हाला पद्मानं सगळं सांगितलं असेलच.
अभिजित : सांगितलं...पण रणजितने लग्न केलं, हे मला कुणीच कळवलं नाही. काय माणूस आहे हा...
निशा : अहो, तुम्ही उभे का, बसा ना...
(तो सोफ्यावर बसतो.)
तुम्ही चहा घेणार का? (तो मानेने नाही म्हणतो.)
(पद्मा किचनमध्ये चहा करायला निघून जाते.)
निशा : सिगारेट ओढता का तुम्ही? (त्यालाही तो नाही म्हणतो) सोडली वाटतं ...तुरुंगात गेल्यानंतर--
अभिजित : देवा शप्पथ सांगतो, वहिनी, त्या दरोड्याशी माझा काही काही संबंध नव्हता.
निशा : मला पूर्ण कल्पना आहे.
अभिजित : रणजितचं रूप देऊन नियतीनं माझ्यावर घणाघाती वार केलाय. मी पार खचून गेलोय...मोडून गेलोय...पण काय करणार? त्यानेच मला लहानाचा मोठा केला. वास्तविक मी त्याच्या धाकातच वाढलो. स्वतंत्रपणे विचार

करण्याची माझ्यात आता कुवतच राहिली नाही. पद्मामुळे थोडाफार आत्मविश्वास आलाय माझ्यात. पण तो आमच्या लग्नाला कधीच परवानगी देणार नाही,

निशा : भाऊजी, ह्या घरात रणजितबरोबर मी एक क्षणही सुरक्षित नाही. कालपर्यंत माझीही तुमच्यासारखीच अवस्था होती. पण काल तुमचं पत्र आलं तेव्हा कळलं...रणजितला एक भाऊ आहे. त्याच्या सारखाच. तेव्हाच माझ्या डोक्यात एक विलक्षण कल्पना आली.

अभिजित : कल्पना ?

निशा : अफलातून कल्पना आहे. थोडासा स्वार्थाचा भाग आहे त्यात; पण सर्वांचा फायदा आहे (ह्याच वेळेस पद्मा चहाचा ट्रे घेऊन आत येते.) तुम्ही चहा घ्या. मी– माझी योजना सांगते.

पद्मा : योजना ? कसली योजना ? निशाताई, आम्हाला तुमच्या कुठल्याही कारस्थानात सामील व्हायचं नाहीए.

अभिजित : माझंही तेच म्हणणं आहे.

निशा : माझी योजना यशस्वी होण्यासाठी मला तुमच्या दोघांचीही गरज आहे.

पद्मा : निशाताई, मी माझा शब्द पाळलाय. अभिजितला तुमच्यासमोर उभा केलाय. त्याच्या मोबदल्यात तुम्ही जी रक्कम मला देणार होता; त्याची ताबडतोब व्यवस्था करा, म्हणजे आम्ही जायला मोकळे...

निशा : प्लीज पद्मा...तडकाफडकी निघून जाण्याचा अविचार करू नकोस... मला रणजितच्या तावडीतून सुटायचंय...मला घटस्फोट हवाय...

पद्मा : घ्या ना...कोणी अडवलंय तुम्हाला ?

निशा : रणजितनं...तो माझा जीव घेईल; पण घटस्फोट देणार नाही.

पद्मा : मग त्याला आम्ही काय करणार ?

निशा : तुम्ही बरंच काही करू शकता...विशेषतः अभिजित...

अभिजित : मी ...?

निशा : होय. तुम्हा दोघा भावांत असलेल्या साम्याचा गैरफायदा रणजितने अनेकदा घेतला. तेच मी करणार आहे...माझ्या फायद्यासाठी. त्याच्याच पद्धतीने त्याच्यावर मात करायची योजना आखली आहे मी...काही तासांसाठी अभिजितला रणजितची भूमिका करावी लागेल...

अभिजित : रणजितची भूमिका...? मी समजलो नाही. पद्मा—

निशा : मी सांगते ना समजावून...जो कोणी वकील, ॲडव्होकेट, सॉलिसिटर आपण ठरवू, त्याच्यासमोर तुम्हाला डिक्लेर करावं लागेल...

पद्मा : काय ?

निशा : मी रणजित परदेशी...निशा परदेशीला घटस्फोट द्यायला तयार आहे. घट-

स्फोटासंबंधी तयार केलेल्या कागदपत्रांवर संबंधित व्यक्तीसमोर अभिजितला रणजितची सही करावी लागेल. रणजितपासून माझी कायमची सुटका होईल. तुम्हीही सुटाल. कोठेतरी लांब जा...संसार करा...आणि मी पुन्हा कलकत्त्याला जाईन...काय वाटते तुम्हाला...?

(लॉंग पॉझ)

अभिजित : नाही नाही...माझ्याच्याने हे धाडस होणार नाही. वेडा माणूसही छातीठोकपणे सांगेल...की मी रणजित नाही...

निशा : त्या बाबतीत आवश्यक काळजी आपण घेऊच; पण सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रणजितची सही.

अभिजित : नाही नाही...रणजितला अशा पद्धतीने आव्हान द्यायचं; म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशी गाठ. पद्मा, अगं तू सांग ना यांना. (उठून उभा राहतो.)

पद्मा : डोकं फिरवू नकोस माझं...बैस तिथे मुकाट्याने...

(तो जाऊन बसतो. त्याच्याजवळ जाऊन बसते...)

मी मान्य करते. आयुष्यात कधीही तू रणजितची जागा घेऊ शकणार नाहीस; पण त्यातूनही काही तोडगा निघतोय का पाहायला नको ?

निशा : (पद्माला) मी कुठे त्याला भाषणबाजी करायला सांगतेय ? मला त्याची केवळ उपस्थिती हवीय...एक सही हवीय...

पद्मा : ठीक आहे...अभिजितला मी तयार केला, तर तुमची कितपत तयारी आहे ?

निशा : तयारी ? कसली ?

पद्मा : ह्याची ! (पैशाची)

निशा : व्हेरी गुड ! तुझी काय अपेक्षा आहे.

पद्मा : आमच्या दोघांचं गणित कच्चं आहे. ह्या भरीव कामगिरीचं मोल तुम्हीच ठरवा. पण देण्या-घेण्यावरून बोलणी फिसकटू नयेत म्हणजे झालं !

निशा : असं म्हणतेस ? मग तू ठरवशील ते...

पद्मा : एक लाख पंचाहत्तर हजार ! अधिक पंचवीस हजार...अभिजितला इथे आणलाय त्याचे...

निशा : रक्कम जरा मोठी वाटतेय...

अभिजित : माझंही तेच म्हणणं आहे !

पद्मा : तुझं मत कुणी विचारलंय का ? (निशाला) दोन लाख ! एक तांबडा पैसा कमी घेणार नाही.

निशा : (हसत) परिस्थितीचा फायदा कसा घ्यावा हे चांगलं कळतं तुला...

पद्मा : तुमच्याकडूनच शिकले मी...

निशा : तू हुषार आहेस. आणि चलाखसुद्धा ! मला ह्या कामासाठी चलाख माणसंच हवीत...

पद्मा : ह्या सौद्यात पारडं तुमच्या बाजूनं जड आहे, हे काय मला कळत नाहीय का ? तुमच्यासाठी दोन लाख म्हणजे किस झाडकी पत्ती...

निशा : दर्या में खस खस...

अभिजित : पण मी काय म्हणत होतो...

पद्मा : तुला आम्ही काही विचारलंय का ? निशाताई, तुम्ही आम्हाला हे पैसे केव्हा आणि कसे देणार ?

निशा : हप्त्या हप्त्याने...

पद्मा : हप्त्या हप्त्याने ? असं झारापकरांसारखं बोलू नका हो !

अभिजित : आता हा झारापकर कोण ?

निशा : आत्ता मी तुला ५० हजार रुपये देतेय... पन्नास हजारांचा दुसरा हप्ता; अभिजित रणजितच्या भूमिकेची तालीम सुरू करील तेव्हा. तिसरा हप्ता; वकिलासमोर सही करण्यापूर्वी आणि शेवटचे पन्नास हजार रणजितची सही–सही सही केल्यानंतर.

पद्मा : तुमच्या अटी मला मान्य आहेत ! ( अभिजितला ) ऐकलंस का तू ?

अभिजित : ऐकलं... पण माझं मत कुणीच विचारात घेत नाही. तेव्हा यातलं काहीही मला मान्य नाही.

पद्मा : वेड लागलंय का तुला ? दोन लाखात आपल्या आयुष्याचं कल्याण होईल.

अभिजित : नुकताच तुरुंगातून सुटून येतोय... ह्या फ्रॉडमध्ये अडकलो तर दहा वर्षांची लागेल ! ( निशाला ) तुमचा घटस्फोट राहला बाजूला; आमच्या लग्नाचे बारा वाजतील !

पद्मा : अभिजित, तू मेकड आहेस. तुझ्यात आव्हान स्वीकारायची हिम्मतच नाही.

अभिजित : पण मी लग्नाला तयार आहे ना ! अगं, तुझ्याशिवाय मला आहे का कुणाचा आधार ?

पद्मा : पुरुषासारखा पुरुष तू... एका सामान्य स्त्रीचा आधार घेऊन जगणार आहेस का तू ? हातांत बांगड्या घाल त्यापेक्षा...

अभिजित : ( त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलतात. ) पद्मा, ह्यापुढे तुझ्या तोंडून एक शब्द जरी बाहेर पडला, तर...

पद्मा : काय करशील ? जीव घेशील माझा ? घे.

( अभिजित पद्माच्या थोबाडीत मारतो. आपण रागाच्या भरात काहीतरीच केलं ह्याची त्याला जाणीव होते... तो पटकन मागे वळतो व टेबलाकडे येऊन... जोराने आपला हात संतापून टेबलावर आपटतो... त्याच्या ह्या हालचाली निशा व पद्मा बावरून पाहतात व काहीतरी हेरल्याप्रमाणे दोघी एकमेकींकडे पाहतात. )

निशा : परफेक्ट ! क्षणभर वाटलं... रणजितच आहे...

अभिजित : (दचकून) रणजित ? कुठे आहे रणजित !

निशा : सध्या रणजित आहे पणजीत.... तुम्ही घाबरताय कशाला ?– संतापल्यावर तुमचा चेहरा, तुमचं बोलणं–चालणं, डोळे... हुबेहूब रणजितसारखंच वाटलं...

पद्मा : अभिजित, प्लीज... तू प्रयत्न कर. आपण दोन लाखाचे धनी होऊ !

निशा : ह्या क्षणाला पैशाचा मुद्दा महत्त्वाचा नाहीए...अभिजित, रणजितची भूमिका कशी काय वठवतोय हे महत्त्वाचं आहे. हे आव्हानाचं शिवधनुष्य.

अभिजित : पण तुम्ही लोकांनी मला मदत करायला हवी; नाहीतर...

निशा : आम्ही तुम्हाला सांभाळून घेऊ...

पद्मा : ( विचारात हरवलेल्या अभिजितला) चहा घे...

निशा : चहा घ्या आणि तालमीला सुरुवात करा...पण त्यापूर्वी हा चष्मा काढायला विसरू नका...

(पद्मा अभिजितच्या हातात चहाचा कप देते...निशा वर बेडरूममध्ये जाते –पद्मा अभिजितचा चष्मा काढते.)

अभिजित : ( वैतागून) हात लावू नको चष्म्याला...मला जवळचं दिसत नाही !

पद्मा : जवळचं दिसलं नाही तरी चालेल. माणसाला दूरदृष्टी हवी...दोन लाख. आहेस कुठे ?

( बेडरूममधून निशा बाहेर येते. तिच्या हातात रणजितचा गाऊन आहे.)

निशा : हा गाऊन घालून बघा ! ( तो गाऊन घालतो.) फर्स्ट क्लास...

( त्याला वरपासून खालपर्यंत पाहाते.)

पद्मा रणजितचे स्लीपर्स घेऊन ये...

पद्मा : आणि केसांची स्टाईलसुद्धा बदलायला हवी...

(पद्मा आपल्या पर्समधून फणी काढते व केसांची स्टाईल बदलायचा प्रयत्न करते...निशा त्याच्या चपला काढायला लावते व स्लीपर्स देते.)

निशा : अभिजित...आता थोडंसं ग्रेसफुली चालून दाखवा पाहू.

(अभिजित छाती पुढे करून व दोन्ही हात ताठ ठेवून चालतो. पद्मा व निशा दोघी कपाळाला हात लावतात...अभिजित नर्व्हस होतो व सोफ्यावर बसतो.)

अभिजित : तरी मी तुम्हाला सांगत होतो. हे अवघड काम आहे.

पद्मा : अवघड आहे; म्हणून अवघडल्यासारखं चालायची काही गरज आहे ? अरे, ऐटीत चाल...

( चालून दाखवते... )

अभिजित : आयुष्यात कधी ऐटीत चाललो नाही.

(डोअर बेल वाजते...तिथेही दचकतात...अभिजित बेडरूमकडे पळतो; पण त्यापूर्वीच निशा व पद्मा त्याला धरून आणतात व सोफ्यावर बसवतात. तो अतिशय घाबरलेला आहे. पद्मा मेनडोअरकडे येते.)

पद्मा : कोण ?

सुब्रह्मण्यम् : (बाहेरूनच) मी सुब्रम्हण्यम...(पद्मा दार उघडते...)गुड मॉर्निंग मिसेस रणजित...

निशा : कोण ? सुब्रह्मण्यम...या ना...

(पद्माच्या सांगण्यावरून अभिजित 'या या' अशा पद्धतीने मान हलवतो. पण सुब्रम्हण्यमचं लक्ष अजूनही अभिजितकडे गेलेले नाहीय ! ) तुम्ही इतक्या लवकर कसे आलात ?

सुब्रह्मण्यम् : तुम्ही म्हणालात केव्हाही या...

(पद्मा किचनकडे जायला वळते; हे पाहून )

च्हा अजिबात नको...मी घाईत आहे...गाडी बाहेरच पार्क केलीय...

निशा : काही हरकत नाही...

सुब्रह्मण्यम् : ( लक्ष अभिजितकडे जातं) अरे रणजित, तू ? व्हॉट ए सरप्राईस...इतक्या लवकर गोव्यातून आलास... ?

अभिजित : ( स्वतःचा चेहरा हाताने लपविण्याचा प्रयत्न करतो. ) थांबलो नाही मी जास्त वेळ !

निशा : लगेच नेक्स्ट फ्लाईटने तो परत आला.

सुब्रह्मण्यम् : पार्टी एअर पोर्टवरच भेटली वाटतं... ( हसतो. )

निशा : हसू नका. त्यांची तबियत बिघडलीय...

सुब्रह्मण्यम् : का ? काय झालं... ?

अभिजित : विमान लागलं... ( सगळे हसतात )

निशा : पिऊन पिऊन काय अवतार झालाय बघा ..तुम्ही बसा ना...मि. सुब्रह्मण्यम्.

( वरील संवाद बोलले जात असताना पद्मा हळूच व्हिस्कीचा पेग भरून ग्लास अभिजितच्या हातात देते. अभिजितला काही सुचत नाही. तो गोंधळतो व एका दमात ग्लास रिकामा करतो...त्याला त्रास होतो. )

सुब्रह्मण्यम् : रणजित, हे काय आरंभलं आहेस तू ? हॅ... ? लिव्हर बर्स्ट होईल...ही काय पद्धत झाली प्यायची ? ..

(निशाला) अहो, लक्ष द्या ह्या माणसाकडे... (ब्रीफकेस उघडून) पाच हजार रुपये घेऊन आलोय...

निशा : पास्कलला द्यायचे आहेत ना हे पैसे ? (पैसे घेण्यासाठी हात पुढे करते. )

सुब्रह्मण्यम् : होय ! पण रणजित इथं हजरच आहे, तेव्हा त्याच्याच हातात देतो... काय ?

निशा : माझ्याकडे दिलेत तरी चालेल!

सुब्रह्मण्यम् : (उठून अभिजितकडे जातो. त्याच्या समोर बसतो.) मोजून घे, पाच हजार आहेत.

(अभिजितची तारांबळ उडते. तो मोठमोठ्याने खोकायला सुरुवात करतो. मध्येच घसा साफ करतो. सुब्रह्मण्यम् टीपॉयवर नोटांचं बंडल ठेवतो.)

बरं, ते जाऊ दे! गोव्याची ट्रीप कशी झाली? काम झालं का आपलं?

(अभिजित निशाकडे आणि पद्माकडे पाहतो... त्या अभिजितला "होय" म्हणायला सांगतात.)

अभिजित : काम झालंय; पण...नंतर बोलू आपण...

सुब्रह्मण्यम् : काम झाल्याशी कर्तव्य. नंतर बोलला नाहीस तरी चालेल...

निशा : तुमचं काम झालंय. माझ्यावर विश्वास आहे ना?

(व्हिस्कीची बॉटल उचलून अभिजित सरळ तोंडाला लावतो.)

सुब्रह्मण्यम् : रणजित, स्टॉप ड्रिंकिंग धिस वे...नाहीतर शॉर्टकटने वर जाशील...

निशा : रणजित... माझं ऐक... बेडरूममध्ये जाऊन पड. एकदोन तास झोप काढल्यावर बरं वाटेल... जा...

सुब्रह्मण्यम् : गुड आयडिया... पण त्यापूर्वी; पाच हजार रुपये मिळाल्याची पावती देतो, त्यावर सही करून दे...

(अभिजितच्या समोरून उठतो व ब्रीफकेस ठेवलेल्या जागी जाऊन ब्रीफकेस उघडतो. त्यातील पेपर्स चाळतो. ह्यावेळेस निशाला "रणजितच्या" हातावरील बॅण्डेजची आठवण होते. तो पद्माला खुणेने सांगण्याचा प्रयत्न करते... पद्माच्या लक्षात येतं... ती हळूच अभिजितकडे जाते. त्याच्या कानात काहीतरी सांगते... अभिजितला त्यातलं काहीच कळत नाही. म्हणून पद्मा वैतागते व अभिजितचा उजवा हात आपल्या हातात घेऊन, बळजबरीने त्याच्या नाईट गाऊनच्या खिशात टाकते.)

अभिजित : नाटकं कसली करता आहात तुम्ही?

सुब्रह्मण्यम् : (ब्रीफकेसमधले पेपर्स पाहात) नाटकं नाही रे बाबा... पैसे मिळाल्याची रिसीट शोधतोय ... (ती दाखवीत) सापडली... ह्यावर तुझी सही हवीय मला... (अभिजितकडे येतो व पावती नाकासमोर धरतो.)

अभिजित : (आता आपलं बिंग नक्कीच फुटणार, तरीही शेवटचा प्रयत्न म्हणून) पद्मा, माझं डोकं भयंकर जड झालंय... मला गरगरल्यासारखं वाटतंय...

(निशा व पद्मा दोघी अभिजितच्या जवळ येतात व उभ्या राहतात.)

निशा : पद्मा... ह्यांना बेडरूममध्ये घेऊन चल... चल... मला मदत कर ना...

(अभिजितला) विश्रांती घे. बरं वाटेल तुला...

(पद्मा व निशा त्याला बेडरुममध्ये घेऊन जातात.)

सुब्रह्मण्यम् : त्यापूर्वी इथं सही करून टाक, रणजित...

निशा : दोन मिनिटं थांबा, सुब्रह्मण्यम्... मी आलेच...

सुब्रह्मण्यम् : पण सही...

निशा : मी करेन सही...

सुब्रह्मण्यम् : पण ते घरात असताना

(रणजितच्या पाठोपाठ जाण्याचा प्रयत्न करतो; पण पद्मा त्यापूर्वीच अभिजितला बेडरूममध्ये घेऊन जाते.)

निशा : ह्या पैशांची जबाबदारी माझी! विश्वास आहे ना माझ्यावर?

सुब्रह्मण्यम् : गरीब माणसाची चेष्टा करताय का? प्रामाणिकपणे सांगायचं तर, तुमच्याकडे पाहूनच मी रणजितबरोबर पैशाच्या व्यवहाराचं धाडस केलं... नाहीतर ह्या व्यसनी माणसाबरोबर? निदान, मी तरी करणार नाही...

निशा : का?

सुब्रह्मण्यम् : तुम्हाला ठाऊक नाही वाटतं? अहो, मी छोट्या मोठ्या अनेक कंपन्यांचा लीगल ॲडव्हायजर आहे. नरिमन पॉईंटच्या मित्तल चेंबर्समध्ये माझं ऑफिस आहे. (खिशातून कार्ड काढून देतो.)

निशा : तुम्ही लॉयर आहात का?

सुब्रह्मण्यम् : नॉट ॲक्झॅक्टली... पण एखाद्या केससंबंधी पुराव्याच्या दृष्टीने कागदपत्रे तयार करून, त्या त्या फिल्डमधल्या नावाजलेल्या वकिलांपर्यंत अशिलांचे ते कागदपत्र पासऑन करणं, हे माझं कामच आहे! मी सर्टिफाय करून पाठविलेले पेपर्स सहसा परत येत नाहीत... बट आय चार्ज ट्रिमेन्डस!

निशा : समजा, माझी एखादी केस तुमच्याकडे सोपवली तर?

सुब्रह्मण्यम् : प्रॉपर्टीसंबंधी आहे का?

निशा : नाही! मला एक ॲफिडेव्हीट करून हवंय...

सुब्रह्मण्यम् : करू की...पण ॲफिडेव्हीट करण्यापूर्वी, मला सत्य परिस्थितीचा आढावा घ्यावा लागेल...

निशा : मि. सुब्रह्मण्यम्...रणजित माझा नवरा आहे. माझ्या आधीपासून तुम्ही त्याला ओळखता ..आमच्यात भयंकर तणाव निर्माण झाला आहे...तो दारू पिऊन रात्री अपरात्री येतो. पैसे दिले नाहीत; तर शिवीगाळ करतो...मारझोडही करतो. हा प्रकार प्रत्यक्षात तुम्ही पाह्यलाय...कबूल...?

सुब्रह्मण्यम् : सगळं मान्य आहे...पण ह्या घरात मी तुमचा सल्लागार म्हणून आलेलो नाही; तर रणजितचा मित्र म्हणून आलोय.

निशा : मला त्याच्याविरुद्ध क्रिमिनल केस टाकायची नाहीए...घटस्फोट हवाय मला.

सुब्रह्मण्यम् : घटस्फोट? पण रणजित तयार होईल का?

निशा : आम्ही दोघांनी मिळूनच हा निर्णय घेतलाय!

सुब्रह्मण्यम् : (विचार करून) नुसतं तोंडी बोलून चालणार नाही! माझ्या समक्ष तुम्हां दोघांना सह्या कराव्या लागतील! रणजित सही करेल, असं वाटत नाही मला...

निशा : ह्याबाबतीत तो तुमच्याशी बोलेलच.. तुमच्या सल्ल्याशिवाय तो सही थोडाच करणार आहे?

सुब्रह्मण्यम् : ह्या सेटलमेन्टसाठी तुम्हाला बरीच मोठी किंमत मोजावी लागली असावी. काय...?

निशा : स्वातंत्र्याची किंमत ठरवता येत नाही. तुम्ही पेपर्स घेऊन केव्हा येताय? आजच्च...शक्य तितक्या लवकर...

सुब्रह्मण्यम् : आजच्या आज?...ठीक आहे! दुपारी येतो.

निशा : दुपारी या...मलाही थोडा अवधी मिळेल...रणजितला तयार करावा लागेल; आयमिन...त्याची उतरली पाहिजे...
(दारूची खूण करून दाखवते.)

सुब्रह्मण्यम् : मॅडम, मी आता तुमच्याच कामाला लागतो...पेपर्स तयार करून त्यांवर तुमच्या दोघांच्या सह्या घेतो...आणि सरळ वकिलाची भेट घेतो. मित्रच आहे तो माझा...रामाराव...घटस्फोटाच्या केसेस हॅण्डल करण्यात त्याचा हातखंडाच आहे. नाव रामाराव असून, स्वतःच पाच वेळा घटस्फोट घेतलाय त्याने!...तर मी निघतो. (घड्याळात पाहून) दुपारी दोनला पेपर्ससहित आलोच म्हणून समजा...

निशा : अवश्य या...(सुब्रह्मण्यय निघतो – पुन्हा थांबतो)

सुब्रह्मण्यम् : कालपर्यंत तुम्ही रणजितच्या तावडीतून मुक्त होण्यासाठी जंगजंग पछाडत होता काणि आज एका दिवसात तुम्ही त्यावर उपायही शोधून काढला!

निशा : कालपर्यंत माझ्याकडे जे नव्हतं; ते मी एका रात्रीत मिळवलं.

सुब्रह्मण्यम् : काय?

निशा : हिम्मत! यश देवाधीन असते. हिम्मत महत्त्वाची! काय?

सुब्रह्मण्यम् : व्हेरी गुड! कीप इट अप! (ब्रीफकेस उचलून) बरोबर दोनच्या ठोक्याला मी इथे हजर असेन.

निशा : उशीर करू नका.
(सुब्रह्मण्यम् बाहेर निघून जातो. वरून पद्मा व अभिजित खाली उतरतात.)
या...या...तुम्ही ऐकलं असेलच!

पद्मा : आमचे कान आम्ही इथे डिपॉझिट करून ठेवले होते.

निशा : फक्त दोन सह्यांची गरज आहे. दोन लाखाच्या दोन सह्या!

पद्मा : तीन सह्या हव्या असतील तर थोडं कन्सेशन देऊ आम्ही!

अभिजित : एका सहीचा अजून नाही पत्ता—

पद्मा : गप्परे ! सकाळी सकाळी नस्तर लावू नकोस ! त्यां सुब्रह्मण्यमला पाहून कुठे पळत होतास ?

निशा : पण त्यांना अजिबात संशय आलेला नाही !
पहिल्या भेटीतच त्यांनी तुम्हाला रणजित म्हणून मान्य केलंय...तीच तर खरी कसोटी होती. पुढे काळजी नाही.

अभिजित : पण मला वाटतेय ना काळजी...

निशा : तुमची काळजी दूर करायचा रामबाण उपाय माझ्याकडे आहे.
(निशा चेकबुक काढून चेक लिहिते व चेक फाडते.)
ठरल्याप्रमाणे हा पहिला हप्ता...बेअरर चेक...

पद्मा : ( चेक स्वतःकडे घेते व वाचून ) थँक्यू मॅडम...फिफ्टी थाउजंड.

निशा : सुब्रह्मण्यम् दुपारी दोनला येणार आहेत. तेव्हा रणजितच्या भूमिकेची तयारी करा.

पद्मा : निशाताई...दुसरा हप्ता अभिजित रणजितच्या भूमिकेची तालीम सुरू करेल; तेव्हा देणार होता ना...?

निशा : (किंचित वैतागून) ओह...आय ॲम सॉरी...

निशा : ( चेक लिहिते व फाडून अभिजितसमोर धरते. पद्मा त्या चेकवर हात टाकण्यापूर्वीच )
ॲ हॅ...ह्या चेकचा खरा मानकरी अभिजित आहे.

पद्मा : हाही बेअरर चेक आहे का पाहात होते.

निशा : अर्थातच ! ( अभिजितकडे जाते. )

अभिजित : नको नको, मला कशाला ?

निशा : घ्या हो, वरच्या खिशात आत्म्याजवळ ठेवा. आत्मविश्वास वाढेल.

अभिजित : असं म्हणताय ? (चेक घेतो)

पद्मा : हरवू नकोस, नीट ठेव.

निशा : आपल्याकडे फक्त चार तासांचा अवधी आहे. अभिजित, तुम्ही वर बेडरूममध्ये जा...रणजितचे कपडे घाला ! चला...चला. लवकर.

अभिजित : (चश्मा काढून) ऑल राईट. (वर जायला निघतो. थांबतो...) साधारणपणे मी कुठले कपडे घालायला हवेत ?

निशा : लेटेस्ट स्टाईलचे !

अभिजित : पण लेटेस्ट स्टाईल काय आहे; मला कल्पना नाही... गेली दोन वर्षे मी तुरुंगात होतो ना. (वर बेडरूममध्ये जातो.)

निशा : पद्मा, तुझ्या मदतीशिवाय हे काम कठीण होतं...

पद्मा : तुमच्यासाठी म्हणून मी तयार झाले हं...

निशा : बरी आठवण झाली... अभिजितच्या उजव्या हाताला बॅण्डेज बांधायला

विसरू नकोस !

पद्मा : (ड्रॉवर मधून बॅण्डेज व कात्री काढते.) ऐन वेळेला गोंधळ उडायला नको. आत्ताच बॅण्डेज तयार करून ठेवते. ( बेडरूममध्ये जाते.)
(टेलिफोनची बेल वाजते.)

निशा : (टेलिफोन उचलून) हॅल्लो...दॅटस राईट...सिक्स...सेव्हन...टू वन... फोर...सिक्स...का ? कॉल फ्रॉम पणजी .. ? यस...आय ॲम होल्डींग इट (पॉझ) कोण- रणजित ? मी निशा बोलतेय...पुन्हा कशासाठी फोन केला ? करमत नाहीए...तिकडे ?... हो हो...सुब्रह्मण्यम पैसे देऊन गेलेत .. पण तो पास्कल अजून आलेला नाहीए...(ओरडून) नीट ऐकू येत नाहीए...मोठ्याने बोल...कसला तरी भयानक आवाज ऐकू येतोय... काय... ? कुठून फोन करतो आहेस म्हणालास ? डेबोलिम एअरपोर्ट-वरून...? पंधरा मिनिटांत तिथून निघतोयस ? घाई करून कशाला येतो आहेस तू ? (नर्व्हस टोनमध्ये) बरं ये .. सांताक्रूझ एअरपोर्टवर कितीपर्यंत येशील म्हणालास ? एक वाजता...? ठीक आहे... जेवणार ना घरी येऊन ...बाय...सी यू...
( फोन खाली ठेवते- निशा अस्वस्थ झाली आहे- पद्मा बेडरूममधून खाली येते.)
आता आली का पंचाईत ? दोन-अडीच तासांत रणजित इथं येतोय —

पद्मा : निशाताई, आम्हाला मोकळं करा ह्या कामातून! आमचं इथं थांबणं धोक्याचं आहे! आणि त्या सुब्रह्मण्यमला फोन करून कळवा... इथं अजिबात येऊ नका म्हणावं...!

निशा : नाही पद्मा, आपला प्लान परफेक्ट आहे.

पद्मा : पण दोनला सुब्रह्मण्यम येतील; त्यापूर्वीच रणजित इथं हजर असेल...त्याचं काय ? महाधूर्त माणूस आहे तो. आपल्या कारस्थानातला 'क' जरी कळला त्याला, तर तो-

निशा : (काहीतरी विचार करीत असल्याप्रमाणे) ह्यातलं एक अक्षरही त्याला समजणार नाही. दोनच्या आधी येतोय ना...येऊ दे...मी त्याची वाट पाहतेय आता.

पद्मा : म्हणजे ?

निशा : बाहेरून आल्यानंतर तो मला नेहमीप्रमाणे व्हिस्कीचा पेग भरायला सांगेल. माझ्याकडे झोपेच्या गोळ्या आहेत- आपण त्याच्या व्हिस्कीत—

पद्मा : झोपेच्या गोळ्या टाकायच्या ?

निशा : गोळ्यांच्या इफेक्टमुळे तो गाढ झोपणार ! त्याला उचलून ह्या कीचनमध्ये टाकायचा आणि दरवाजा लॉक करून टाकायचा !

पद्मा : (पटल्याप्रमाणे) प्लानचा दुसरा भागसुद्धा अफलातून आहे.

निशा : वास्तविक तो येतोय त्यामुळे; धोका निर्माण व्हायची शक्यताच नाही.

पद्मा : ते कसं ?

निशा : रणजित गोव्यातून इतक्यात येणार नाही, ह्या भ्रमात आपण बेसावध राहलो असतो. फोन न करता तो आला असता, तर काही वाटेल ते घडलं असतं. पण आता सगळे ट्रंप कार्ड्स आपल्याकडे आहेत...बेशुद्ध अवस्थेत रणजित आपल्या ताब्यात असेल...

पद्मा : (किंचित थांबून, काळजीच्या सुरात) तुम्हाला खात्री आहे ना ?

निशा : पद्मा, तुझा धीर खचत चाललाय वाटतं...:

पद्मा : त्याचं काय आहे निशाताई, वर्षभर अभ्यास करूनसुद्धा; परीक्षा जवळ आल्यावर धाकधूक होतेच...

(किचनकडे जायला वळते. पण अभिजित बेडरूमच्या जिन्यावरून खाली उतरतोय; म्हणून थांबते. अभिजितने आता रणजितचे कपडे घातलेले आहेत. केसांची स्टाईलसुद्धा त्याने आता चेंज केली आहे.)

अभिजित : रणजितच्या कपड्यात तरी मी त्याच्यासारखा दिसतो का ?

पद्मा : तुला काय वाटतं ?

अभिजित : मला वाटतं, त्याने मला ह्या कपड्यात पाहिलं, तर तो मला नागडा करून पाठवेल.

(सगळे हसतात. पण प्रसंगाचं गांभीर्य ओळखून एकाचवेळी सगळे गप्प होतात.)

अजून काही हवंय का ?

पद्मा : चिरूट... ! रणजित नेहमी चिरूट ओढतो... (चिरूट आणून देते.)

अभिजित : मी ओढणार नाही. खोकायला लागलो तर समोरच्याला संशय आल्याशिवाय राहणार नाही.

पद्मा : फक्त दोन दम मारायचेत, एक सही करायचीय; की बस्स ! आपण दोन लाखांचे धनी झालो.

निशा : माय गॉड ! सहीचं काय ! त्याच्या सहीची नक्कल करता येईल का तुम्हाला ?

अभिजित : इतका वेळ वर बसून मी माशा मारत नव्हतो. सहीची प्रॅक्टिस करत होतो ! (कोटाच्या खिशातून रिळाच्या आकाराचा पेपररोल काढतो व एखादी फिल्म दाखविल्याप्रमाणे त्यावरील सह्या दाखवितो.)

निशा : फॅन्टॅस्टीक !

अभिजित : त्याच्या माझ्या दिसण्यातच साम्य आहे असं समजू नका...अक्षरातसुद्धा साम्य आहे...पण तरीही माझं स्वतंत्र व्यक्तिमत्त्वच नाही...मी रणजित सारखा दिसतो; रणजित अभिजित सारखा दिसतो असं कुणीही सांगत

नाही. त्याला नेहमीच ग्रहांची साथ लाभली; तर मी ग्रहांच्या कचाट्यांत सापडत गेलो.

निशा : (सही तपासत) भाऊजी, रणजित मधला आर किंचीत मोठा हवा...

अभिजित : तो माझ्यापेक्षा एक वर्षाने मोठा आहे ना; तेवढा फरक राहणारच!
(चिरूट पेटवतो.)

निशा : भाऊजी, आपल्या प्लानमध्ये थोडासा बदल झालाय. दोन ते अडीच तासांत रणजित इथं येतोय.
(चिरूटाचा त्याला ठसका लागतो. खोकायला लागतो व अंगावरील कपडे काढायला सुरुवात करतो. त्याची धावपळ सुरू होते.)

पद्मा : वेड लागलंय का तुला?

निशा : रणजित आल्यावर त्याच्या व्हिस्कीच्या ग्लासात मी झोपेच्या गोळ्या टाकून, त्याला किचनमध्ये कोंडून ठेवणार आहे.

अभिजित : पण एकदा झोपेच्या गोळ्या दिल्यानंतर; त्याला कोंडून ठेवायची गरज काय?

पद्मा : तो इथे आल्यावर; अभिजित, तुला कुठंतरी लपून बसावं लागेल!

अभिजित : कुठे लपायचं ते तू मला सांगू नकोस. माझी एक जागा आहे....काटेरी तारेच्या कुंपणाला लागून एक विहीर आहे. खरं म्हणजे; मी तिथंच लहानाचा मोठा झालो.

निशा : आता आपल्याकडे वेळ फार थोडा आहे. सुब्रह्मण्यम आल्यानंतर आपण काय बोलायचं, काय करायचं याची तालीम करायला हवी.
(इतर दोघांना सूचना व दिग्दर्शन करीत असल्याप्रमाणे.)
अभिजित, तुम्ही या सोफ्यावर बसा... (तो बसतो.) व्हेरी गुड... हातात चिरूट धरा... तुम्ही आनंदात आहात... प्रसन्न आहात. कारण घट-स्फोटाच्या सेटलमेन्टमध्ये तुमची चांदी झालीय. मोठी बाजी मारलीत... चिरूटाचा मोठा पफ घ्या.
(चिरूट शक्यतो विझलेली असावी...तो पफ घेतो.)
पद्मा, तू किचनच्या दारामागे उभी राहा. तुझ्या हातांत चहाचा ट्रे आहे. हा घे तुझा ट्रे...! (एखादं मॅगझिन देते) मी आणि अभिजित–म्हणजेच रणजित– इथं बसलोय...आम्ही बोलतोय...बोलतोय...बोलतोय...

निशा : अरे वाह! चहा आला... थँक्यू पद्मा... (पद्माला) एंट्री घे... (ती बाहेर येते. निशा पटकन जागेवरून उठते व मेन डोअरकडे येत...) या... या... सुब्रह्मण्यम्, आत या...

पद्मा : (दचकते. तिच्या हातांतून मॅगझिन खाली पडतं) बापरे! } (एकाचवेळी)
अभिजित : (ताडकन् उठून) सुब्रह्मण्यम्?

निशा : असं काय करताय? आपण तालीम करतोय ना!

(पद्मा खाली बसून मॅगझिन उचलते व त्यात काहीतरी भरते... असं माईम करते.)

निशा : तुझं हे काय चाललंय ?

पद्मा : चहाचा ट्रे खाली पडला. काचा गोळा करतेय.

निशा : चेष्टा करू नका. हातातोंडाशी आलेला माझा घटस्फोटाचा घास; तुम्ही काढून घेणार आहात का ?

(सगळे सुरुवातीप्रमाणे आपापली जागा घेतात. मेन डोअरकडे पाहात.) या या सुब्रह्मण्यम्, आत या ! भयंकर प्रॉम्प्ट आहात बुवा ! दोन म्हणजे दोन. पेपर्स तयार आहेत ना ? रणजितला सहीची भयंकर घाई झालीय. होय की नाही रे ? (तो काहीच उत्तर देत नाही.) रणजित, आपल्या घटस्फोटाचे पेपर्स तयार आहेत. सुब्रह्मण्यम् आलेत म्हटलं... बोल... बोल, काहीतरी बोल, ते आलेत म्हटलं... (तो काहीच उत्तर देत नाही— म्हणून ती संतापते.) अरे, काही तरी बोल... गाढवा.

अभिजित : गाढव... ? वहिनी, तू मला गाढव म्हणालीस ? जा, मी नाही जा...

निशा : आय ॲम सॉरी. ऐनवेळेला असं काही करू नका...

अभिजित : पण मी काय बोलायचं हे तुम्ही मला सांगितलं का ?

निशा : सुब्रह्मण्यमची खात्री पटली पाहिजे— घटस्फोटाचा जो निर्णय घेतलाय त्याच्याशी तुम्ही सहमत आहात; सकाळी सुब्रह्मण्यम् आले होते, तेव्हा तुम्ही फारसे शुद्धीत नव्हता; पण ह्या क्षणाला तुम्ही फ्रेश आहात...आता घटस्फोटाचं कारण... नवराबायकोत मतभेद. रोजची भांडणं... घरात शांतता नाही. एखाद्या दिवशी भयानक काहीतरी घडण्यापूर्वी घटस्फोट घेतलेला काय वाईट...? नंतर सुब्रह्मण्यमला विचारायचं...'ती दलिंदर सही कुठे करायची तेवढं सांगा'... दलिंदर ही त्याची आवडती शिवी आहे ...

अभिजित : माहीत आहे... तो मला दलिंदर म्हणूनच हाक मारतो.

निशा : व्हेरी गुड्. पण सही करण्यापूर्वी...

अभिजित : थांबायचं... सगळं एकदम सांगू नका... लक्षात राहणार नाही माझ्या.

निशा : ठीक आहे. सध्या आपण ह्याच सीनची तालीम करू या. आता सुब्रह्मण्यमची भूमिका मी करतेय. तुम्ही तुमचीच— म्हणजे रणजितची— आणि पद्मा - तू माझं काम कर...

पद्मा : म्हणजे; तुम्ही माझा चहावाल्याचा रोल कापून टाकला... ?

अभिजित : (रणजितच्या स्टाईलने तोंडातून चिरूट काढत...) होय...

पद्मा : का ?

रणजित : तू कपबशा फोडल्या म्हणून... दलिंदर कुठली !

**(पहिला अंक समाप्त)**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
अ. क्र. २२५७५ नों. दि. ७।७।८८
वि. नाटक क्र. ........

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

(स्थळ : तेच.)
(वेळ : एक तासानंतरची.)

(पडदा उघडतो तेव्हां अभिजित रंगमंचावर रणजितच्या भूमिकेची तालीम करीत आहे. अभिजित आता आत्मविश्वासाने रणजितची नक्कल करीत आहे; हे प्रेक्षकांच्या लक्षात येईल अशा तऱ्हेने प्रॉजेक्ट व्हावे.)

अभिजित : आय ॲम सॉरी, मिस्टर सुब्रह्मण्यम्! सकाळी तुम्ही आलात तेव्हां मला तुमच्याशी नीट बोलता आलं नाही... पण आता मात्र मी फ्रेश आहे. काय म्हणालात ?... घटस्फोट... तो निर्णय मीच घेतलाय... सकाळ-संध्याकाळ त्याच त्या कटकटी; दारू पिऊ नकोस; जुगार खेळू नको, हे करू नको; ते करू नको– ती दळिंदर सही कुठं करायची; तेवढं सांगा.
(निशा बेडरूममधून बाहेर येते – अभिजितच्या हालचाली पाहते.)

निशा : फॅन्टास्टीक...सुब्रह्मण्यम्‌ची थाटात फसवणूक होणार असं दिसतंय.

अभिजित : सुब्रह्मण्यमला येऊ द्या... नंतर बघा. (घाबरल्याप्रमाणे) वाजले किती ? धाकधूक सुरू झाली... (पद्मा कीचनमधून बाहेर येते.) आता मी विहिरीत जाऊन पडतो–आय मीन लपतो !

निशा : लपून बस. झोपू नको.

अभिजित : गरज वाटली तरच बोलवा हं मला. (ॲश ट्रे मध्ये चिरूट विझवतो.)

पद्मा : तू नीघ आता ! गुडलक !

अभिजित : तुम्हालाही गुडलक ! दीड वर्षाचा तुरुंगवास भोगून मी कालच सुटलो; आणि आज मला तोंड लपवावं लागतंय.

(तो बाहेर जातो.)

निशा : फक्त एक गोळी. पाच मिनिटांच्या आत; घेणारा घोरायला लागलाच म्हणून समजा. कुदरत के अनमोल खजाने से, १७ जडी बुटीसे बनाई गयी निंद हराम गोलियाँ! कुम्भकर्णभी हमारीही गोलियाँ खाकर छः छः महिने सोता था!

पद्मा : टिंग टाँग...

निशा : रणजित नेहमी बर्फात व्हिस्की घेतो. ऑन द रॉकस्! आइसबकेट पटकन घेऊन ये. (पद्मा किचनमध्ये जाऊन आइसबकेट घेऊन येते...तो पर्यंत निशा व्हिस्कीची बॉटल, ग्लासेस वगैरे मांडून ठेवते.)

निशा : पद्मा, आपली सगळी तयारी झालीय.
(याच वेळेस कार थांबल्याचा आवाज येतो.)

रणजित : (बाहेरूनच) निशा डार्लिंग, मी आलो...
(निशा घरात चारी बाजूला एक नजर फिरवते; संशय येईल असा कुठलाच पुरावा राहून जाऊ नये या दृष्टीने. काही क्षणांनंतर रणजित प्रवेशतो. हातात सूटकेस व कोट आहे. हातातल्या घावावर नवीन ड्रेसिंग आहे.)
(निशाला दारातच पाहून) अरे व्वा...माझ्या आगमनासाठी चक्क दारात उभी आहेस तू?

निशा : पंचारती घेऊन ओवाळणार होते, पण वेळ कमी पडला.

रणजित : यू आर राइट! फ्लाईट १० मिनिटं लवकर आली.

निशा : ट्रीप कशी झाली?

रणजित : फॅन्टॅस्टिक! पेपर क्लीअर होते. म्हणून प्रॉब्लेम आला नाही. मुंबईसारखी दळिंदर माणसं नाहीत आमच्या गोव्यात. निशा, आता आपले मतभेद संपुष्टात आलेत असं समजून; नवीन आयुष्य सुरू करायचं...
(तिला मिठीत घेतो.)

निशा : माझंही तेच म्हणणं आहे. नवीन आयुष्याची नवीन सुरुवात!
(बाजूला होते व बारकडे जाते. ग्लासात आइस टाकते ..आधीच बारच्या एका कोपऱ्यातून पिल्स उचलून ग्लासात टाकते...व त्यात व्हिस्की ओतते. तिचा हा बिझनेस चालू असताना, रणजित टपाल पाहतोय.)

निशा : ही घे तुझी व्हिस्की ऑन द रॉक्स!

रणजित : अरे व्वा! क्या बात है।
(हात पुढे करतो...विचार करून)
निशा, ती व्हिस्की नकोय मला.

निशा : घे रे, पिण्याबद्दल माझं काही म्हणणं नाही...पण घरात घ्यावी म्हणतेय मी..

रणजित : (हातावरील बॅण्डेज दाखवीत...) आज सकाळीच गोव्यात एका डॉक्टरकडे

गेलो होतो. त्यानंच हे ड्रेसिंग केलं. ॲण्टीबायोटिक्सचं इंजेक्शन घेतलंय. शक्यतो आल्कोहोल घेऊ नका; असं म्हणालाय तो.

निशा : फार त्रास होतोय का ?

रणजित : स्लाईट इन्फेक्शन झालंय! दोन दिवस व्हिस्कीला हातच लावणार नाही.

निशा : पण मी पेग तयार केलाय...

रणजित : मग तू घेऊन टाक.

निशा : मी ? नको...नको, दुपारी मला आवडत नाही घ्यायला. चल, हा एवढा पेग संपवून टाक--

रणजित : फारच आग्रह करते आहेस तू...तेव्हा माझा नाइलाजच आहे.
(तिच्या हातातून ग्लास घेतो...व तोंडाला लावणार इतक्यात...)
डार्लिंग, तू एक सीप घे ना... (तिच्या ओठांपर्यंत ग्लास नेतो.)

निशा : (ग्लास बाजूला करून) नको, हा पेग तू संपव. मी आणते ना माझ्यासाठी.
(ती बारकडे जाते व व्हिस्कीचा पेग भरते आणि रणजितकडे येते.)
चिअर्स. नवीन आयुष्याची नवीन सुरुवात.

रणजित : चिअर्स! नवीन आयुष्याची नवीन सुरुवात.
(तो पिणार इतक्यात; शोकेसवर असलेल्या पाच हजार रुपयांच्या बंडलाकडे त्याचं लक्ष जातं...तिथं जात.) हा पास्कल अजून आलेला दिसत नाही-
(नोटांचं बंडल उचलतो व तिथं ग्लास ठेवतो आणि पैसे मोजत बसतो.)

निशा : तो येईल म्हणून पैसे वरच ठेवले होते.
(रणजितचा ग्लास उचलून त्याच्यासमोर ठेवते.)

रणजित : काही हरकत नाही. संध्याकाळी मी जाऊन येईन त्याच्याकडे. (पैसे मोजायला लागतो. हात दुखतो, म्हणून तो पैसे एकाच हाताने मोजतोय.) हात भयंकर दुखतोय. (पॉझ) शहाणपणा केलेला बरा तुझा ग्लास दे! ह्यातला अर्धा पेग तू घेऊन टाक. (तिच्या ग्लासात ओततो- पॉझ)

निशा : (काहीतरी विषय काढून, स्वतःच्या ग्लासातली व्हिस्की प्यायचं टाळते.)
पैसे मोजून झाले नाहीत ?

रणजित : वास्तविक; मोजायची गरज नाही... (नोटांचं बंडल बाजूला ठेवतो.)

निशा : अरे, मग ड्रॉवरमध्ये ठेव. पैसे आहेत ते...

रणजित : यू आर राईट... (उठतो व पैसे ड्रॉवरमध्ये ठेवतो.)
(त्याची पाठ फिरल्याबरोबर निशा स्वतःच्या ग्लासातील व्हिस्की बाहेर फेकते आणि ग्लास संपवत असल्याप्रमाणे तोंडाजवळ नेते. तिचा रिकामा ग्लास पाहून रणजित चकित होतो.) भयंकर सुपर फास्ट काम चाललंय तुझं... विचार काय आहे ?

निशा : एकदा सुरुवात केली की मग थांबायचं कशाला ?

रणजित : करेक्ट ! हा पेगसुद्धा संपवून टाक आता... (स्वतःचा ग्लास देतो) पटकन एका दमात घेऊन टाक.

निशा : नको, मला त्रास होईल...

रणजित : काही त्रास होत नाही. घे म्हणतोय ना.
(स्वतःच्या हाताने तिला पाजायचा प्रयत्न करतो.)

निशा : मी घेतेय...मला फोर्स करू नकोस.

रणजित : तू हवेत कशी तरंगतेस पाहायचंय मला... (मोठ्याने हसतो.)

निशा : प्लीज, रणजित, मला नकोय...

रणजित : घ्यावीच लागेल...
(तिच्या गळ्याभोवती हात टाकतो व बळजबरीने तिला ती व्हिस्की पाजतो. मोठ्यानं हसतो.)
(निशा स्वतःला रणजितपासून सोडवून घेते व गोळ्यांचा इफेक्ट कमी व्हावा, म्हणून पाण्याची बॉटल उचलून सरळ तोंडाला लावते.)
(रणजित कोट व सूटकेस घेऊन मोठ्याने हसत हसत बेडरूममध्ये जातो. तो गेल्यानंतर कीचनमधून पद्मा बाहेर येते...)

पद्मा : (दबलेल्या आवाजात) गोळ्या टाकल्या का व्हिस्कीत ?

निशा : होय...

पद्मा : प्यायला का तो ?

निशा : तो नाही, मी प्यायले !

पद्मा : वाट लागली ! आता ?

निशा : काही तरी वाट काढ !

पद्मा : तुम्हीच काढा. (वरून रणजितचा आवाज ऐकू येतो.)
जेवण वाढायला घेऊ का निशाताई ?
(रणजित येतो.)

निशा : जेवणापूर्वी एखादा पेग घे ना...व्हिस्की घेऊ नकोस, बिअर प्यायला काय हरकत आहे ?

रणजित : गुड आयडिया ! बिअर चालेल.

निशा : पद्मा, फ्रीजमधून चिल्ड बीअर घेऊन ये.
(ती किचनमध्ये जाते. जाण्यापूर्वी स्लीपींग पिल्सची बॉटल ती बरोबर घेऊन जाते. अॅश ट्रेमध्ये चिरूट विझवायला रणजित अॅश ट्रे शोधतो. नंतर त्याच्या लक्षात येते ..अश ट्रे बार मध्ये आहे. तो तिथे जातो. चिरूट टाकणार इतक्यात; त्याचं लक्ष अभिजितने टाकलेल्या चिरूटकडे जातं...चिरूट बोटांत अलगद धरून...)

रणजित : हे काय ?

निशा : चिरूट.
रणजित : कोण ओढत होतं...?
निशा : मी !
रणजित : (आश्चर्याने) एका दिवसात भलताच बदल झालाय तुझ्यात. सिगारेटी काय ओढतेस...व्हिस्की काय पितेस...

(पद्मा किचनमधून बाहेर येते. तिच्या हातात बिअरचा भरलेला ग्लास आहे. पद्मा तो ग्लास घेऊन रणजितकडे येते. तिचा हात थरथरतोय... )

पद्मा : साहेब, तुमची बिअर...
रणजित : (हसतो) बिअरची कल्पना चांगली आहे. (सोफ्यावर बसतो.) काय म्हणतेस पद्मा ?

(सहज त्याचा हात सोफ्यावरील दोन कुशनमध्ये जातो. पहिल्या प्रवेशाच्या सुरुवातीस निशाने लपवून ठेवलेल्या एन्व्हलपचा स्पर्श त्याच्या हाताला होतो. एन्व्हलप कुशनच्या खालून तो काढतो– त्या एन्व्हलपवरील नाव व पत्ता वाचतो. )

ही काय भानगड आहे ? रिकामं दिसतय ! पद्मा; तुझ्या नावावर आलंय... (पोस्टाचा स्टॅम्प पाहतो.)

(कव्हर उलट करून पाहतो. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलतात. तो संतापलेला आहे. मनात काहीतरी ठरवतो, व शांतपणे...)

कव्हर रिकामं आहे...पत्र कुठं आहे ?

पद्मा : पत्र जाळून टाकलं... (ती घाबरलेली आहे)
रणजित : जाळून टाकलंस ? अरे दलिंदर...तुझ्या यारची चिठ्ठी होती ना ?
पद्मा : होय साहेब !
रणजित : काय म्हणतोय; बरा आहे ना ?
पद्मा : होय साहेब !
रणजित : अजूनही त्याच ठिकाणी आहे का ?
पद्मा : होय साहेब !
रणजित : ठिकाण आवडलेलं दिसतंय फरिदाबाद !
पद्मा : होय साहेब !
रणजित : त्याला म्हणावं; आता तिकडेच सेटल हो.
पद्मा : होय साहेब !
रणजित : हे कव्हरसुद्धा जाळून टाक...
पद्मा : होय साहेब.

(कव्हर रणजितच्या हातातून हिसकावून घेते.)

(ह्या दरम्यान निशावर स्लीपिंग पिल्सचा इफेक्ट सुरू झाला आहे. ती उभ्या

उभ्या डुलक्या घेतेय. तिला स्वतःला ह्या इफेक्टची पूर्ण कल्पना आहे. म्हणून ती झोप कंट्रोल करण्याचा प्रयत्न करते. पण शेवटी ती सोफ्यावर बसते. तिचे डोळे मिटलेले आहेत व ती घोरायला लागते. रणजितचं लक्ष तिच्याकडे जातं.)

रणजित : निशा डार्लिंग; काय झालं तुला ?

निशा : (दचकून जागी होते ) काही नाही; काही नाही...डोळा लागला...

रणजित : एक काम कर...ही चिल्ड बिअर घेऊन टाक...फ्रेश वाटेल...

निशा : नको...बीअर नकोय मला...माझं डोकं उठलंय...

रणजित : हं...पद्माचं पत्र तुझ्या हातात पडलं म्हणून तू अपसेट झालीस...करेक्ट ? चला; एका रहस्याचा उलगडा तर झाला. निशा, मुद्दाम तुझ्यापासून मी ही लाजिरवाणी गोष्ट लपवून ठेवली होती...ज्याने घराण्याला काळीमा फासला, घरादाराची अब्रू चव्हाट्यावर आणली; त्या भावाची कुठल्या तोंडाने माहिती सांगू ? ह्या घराशी नातं तोडून गुन्हेगार जगाशी नातं जोडलं आणि आता आपल्या कर्मांची पापं फेडतोय. (पद्माला) ह्या माणसाची पत्रं पुन्हा या घरात येता कामा नयेत.

निशा : तुझा कुणी भाऊ असो नसो, मला काही फरक पडत नाही...तू बीअर पिऊन टाक !

रणजित : तू समंजस आहेस. लेट अस सेलीब्रेट (बिअरचा ग्लास वर करतो) पद्मा; ही बीअर तू संपवून टाक !

पद्मा : (जवळजवळ किंचाळून) नको नको...मला नको ती बीअर.

रणजित : का नको .. ? तुमच्या दोघींपैकी कुणीही बीअर घ्यायला तयार नाही ? (पद्मा व निशा एकमेकींकडे पाहतात– रणजित मोठ्याने हसतो व बिअरचा ग्लास आइस-बकेटमध्ये ओतून रिकामा करतो.)

पद्मा : मी जेवण वाढतेय...पटकन जेवून घ्या...जेवताना पाणी घेणार ना ? (पद्मा किचनमध्ये जाते.)

रणजित : निशा, रागावली आहेस का तू ?

निशा : तुझा भाऊ असो नसो...मला काही फरक पडत नाही तू ती बीअर पिऊन टाक ! (अजूनही स्लीपिंग पील्सचा इफेक्ट तिच्यावर आहे.)

रणजित : तुला असं वाटतंय का, मी त्याला मुद्दामहून तुरुंगात सडवतोय... ? काही केलं तरी, तो २६ जानेवारीच्या आधी सुटू शकत नाही...पण तिथल्या जेलरला प्रत्यक्षात भेटून, मी अभिजितला चांगली ट्रीटमेन्ट मिळावी याची व्यवस्था केलीय...

निशा : हा विषयच नकोय मला...तू बीअर पिऊन टाक !

रणजित : म्हणजे तुझा माझ्यावर विश्वास नाही ! थांब, मी तुझी खात्री पटवून देतो...

(पद्मा किचनमधून बाहेर येते.)

(रणजित टेलिफोन उचलतो...डायरीतून नंबर शोधतो व डायल फिरवतो. हॅल्लो...तिहार जेल ? देहली ?.. हॅल्लो, ऑपरेटर...मे आय स्पीक टू नंदकिशोर मेहरा...नमस्ते मेहरा साब...जी मैं...बंबईसे रणजित परदेशी बात कर रहा हूँ! जी हां, अभिजितका बडा भाई...क्या बात है...? हाल क्या है ?...हाल बुरा है ?...क्यों...अरे भैय्या...चार्लस तो तुम्हारी जेलसे भाग निकला...मगर हमारे गोवामें गिरफ्तार किया गया...उसको जमाना हुआ...अब क्या परेशानी है ? क्या कहा ? आतंकवादी परेशान कर रहे है ?... (हसतो) चलो छोडो इन बातोंको. हमारे घरके आतंकवादी का क्या हाल है ? (पॉझ) क्या कहां ? उसको रिहा किया गया ? वो छूट गया ?...क्यो... ? बँक लुटनेवाले कोई और थे ? कब छूटा वह... ? कल ? ..ठीक है...बहुत बहुत धन्यवाद...

(फोन ठेवतो व पद्मा आणि निशाकडे संशयाने पाहतो.)

तो यह बात है ..मेरे साथ कोई खतरनायक खेल खेला जा रहा है.... लक्षात ठेवा...गाठ माझ्याशी आहे.

(दोघींच्या दिशेने एक एक पाऊल टाकतो...त्याही तशाच मागे सरकतात. दोघींनी एकमेकींना धरून ठेवलंय...)

रणजित : काय कारस्थान शिजतंय माझ्या विरुद्ध ? नाही सांगणार ? मी सांगतो... अभिजित तुरुंगातून सुटतो... सरळ इथं येतो. सत्य परिस्थिती सांगून तुमचा विश्वास संपादन करतो... तुम्ही त्याला ह्या घरात आश्रय देता... तो कुठे लपून बसलाय हे काय मला माहीत नाही ? काटेरी तारेच्या कुंपणाला लागून विहीर आहे...तिथंच आहे ना तो ?

(खिशातून रिव्हॉल्व्हर काढतो.)

निशा : खबरदार... रणजित...

पद्मा : मी तुमच्या पाया पडते, साहेब...माझ्या अभिजितला मारू नका... प्लीज, साहेब...

(एकेक पाऊल मागे सरकते व मेनडोअर किंवा किचनमधून बाहेर पळून जाते.)

(बाहेरून ओरडत) अभिजित; तू पळ तिथून... थांबू नकोस पळ—

रणजित : माझा अंदाज खरा ठरला. अभिजित इथंच आहे. दळिंदर लेकाचा! माझ्याच सारखं रूप घेऊन, माझ्या पाठोपाठ जन्माला आला... हा माझा अपमान आहे. सारख्या रूपाची... सारख्या आकाराची, सारख्या वर्णाची दोन माणसं एकाच घरात हवीत कशाला ? दोनपैकी एकाचा निकाल आज लागलाच पाहिजे.

(रिव्हॉल्व्हर तयार करतो... निशा त्याचा मार्ग अडवते.)

रणजित : तुला नीट चालताही येत नाहीए ? काय भानगड काय आहे... निशा डार्लिंग... एखादा कट रचण्यापूर्वी आधी पळवाटांची सोय करायची असते... नाहीतर असं बुमरँग होतं. ह्या पिस्तुलात तीन गोळ्या आहेत. किती ? तीन... आणि माणसंसुद्धा तीनच आहेत... कुणावरही अन्याय होणार नाही. पहिली गोळी... त्या दलिंदरसाठी...दुसरी त्याच्या डेमसाठी ...आणि तिसरी...(पॉझ) तुझ्यासाठी... तुला मी सवलत द्यायला तयार आहे. स्वीस बँकेचा सही केलेला कोरा चेक माझ्या स्वाधीन केलास; तर मी तिसरी गोळी वापरणार नाही !

(निशा त्याचं प्रपोजल मान्य केल्याप्रमाणे मान हलवते व त्याच्या दिशेनं हळूहळू पुढे सरकते व धाडस करून; काचेनं चिरला गेलेला रणजितचा हात;– जिथं नेमकी जखम आहे ती जागा–स्वतःच्या हातांनी दाबते... रणजित किंचाळतो.)

रणजित : यू ब्लडी बीच...

(दोघांची झटापट होते. रणजित हाताच्या दुखण्यामुळे लुळा पडला आहे, तर निशाच्या डोळ्यांवर स्लिपींग पिल्सचा इफेक्ट आहे. कोण कुणावर मात करील हे सांगणं कठीणच आहे. पण झटापटीत पिस्तुलातून गोळी सुटल्याचा आवाज ऐकू येतो. गोळी कुणाला लागली आहे; काही क्षण कुणाला समजत नाही. थोड्या वेळाने निशा उठून उभी राहते. केस व कपडे नीट करते... रणजित हातपाय हलवतो. काही क्षणांतच त्याची हालचाल थांबते. त्याच वेळेस पद्मा बाहेरून येते.)

पद्मा : गोळी सुटल्याचा आवाज ऐकला, म्हणून धावत आले.

निशा : आमच्यात झटापट झाली; रिव्हॉल्व्हर मधून गोळी सुटली आणि...

पद्मा : आणि ?

निशा : पाणी...मला पाणी हवंय... माझं [illegible] कामातून गेलंय...मला भयंकर झोप येतेय...

(वरील सर्व वाक्ये ती जांभया देत कशीबशी पूर्ण करते. पद्मा तिला आधार देत सोफ्यापर्यंत आणते. ती सोफ्यावर कोसळते.)

पद्मा : (बाहेर पाहात...) अभिजित, अभिजित, लवकर ये; इथं...खून...झाला आहे.

(काळोख होतो.)

(प्रवेश समाप्त)

## प्रवेश दुसरा

( स्थळ : तेच. वेळ : एक तासानंतरची. )

( रंगमंचावर प्रकाश येतो; तेव्हा निशा सोफ्यावर बसल्या बसल्या डुलक्या घेत आहे. अजूनही स्लिपींग पील्सचा इफेक्ट तिच्यावर आहे. काही क्षणांनंतर पाण्याचा ग्लास घेऊन पद्मा कीचनमधून प्रवेशते. पाणी निशाच्या तोंडावर शिंपडते– निशा जागी होते. )

निशा : मी इथं काय करतेय, पद्मा... ?...ऑह माय गॉड...मी रणजितचा खून केला—

पद्मा : तो अकस्मात होता. सेल्फ डिफेन्स... आत्मसंरक्षण...गोळी तुमच्याऐवजी त्याला लागली.

निशा : डेड बॉडीचं काय करायचं ? ( वळून पाहते ) अं...बॉडी कुठे आहे ?

पद्मा : मघाशी तुम्ही इथं बसल्या बसल्या डुलक्या घेत होता; तेव्हा अभिजितच्या मदतीने मी बॉडी इथून उचलून विहिरीत टाकलीय...कुणालाही पत्ता लागणार नाही !

निशा : आई गं...मला भीती वाटतेय...

पद्मा : भीती मलाही वाटतेय. पण काय करणार ! एक लाख रुपये अडकलेले आहेत ना आमचे...निशाताई, मध्येच ह्या डेड बॉडीचं एक्सट्रा काम निघालय... त्याचे पन्नास हजार रुपये एक्स्ट्रा लागतील. खून कुणी मूर्ख माणूस करेल हो. पण डेड बॉडीची विल्हेवाट लावणं कठीण असतं...

निशा : पद्मा, तुझी हाव वाढत चालली आहे.

पद्मा : संधीचा फायदा घेते आहे.

निशा : म्हणजे ब्लॅकमेलिंग करतेस... ?

पद्मा : सुब्रह्मण्यम्‌ची यायची वेळ झाली आहे...चला उठा, कामाला लागू या...

निशा : आता काही गरज नाही त्या कामाची.–म्हणजे सुब्रह्मण्यमसमोर अभिजितला रणजित म्हणून उभा करायची गरज नाही. कारण रणजित आता हयात नाही. फार तर यापुढे त्याची विधवा म्हणून मला जगावं लागेल... जगेन मी.

पद्मा : पण तुमच्या नवऱ्याचा मृत्यू कसा आणि केव्हा झाला, हे तुम्ही जाहीर कसं करणार ? जाहीर केलंत तर, आयुष्यभर तुरुंगात बसायची तयारी आहे का ?

निशा : पण मघाशी तूच म्हणालीस ना... आत्मसंरक्षण– सेल्फ डिफेन्स !

पद्मा : ते मी मान्य करते. पण पोलिसांचं काय ? ते विश्वास ठेवतील का या

प्रकारावर... ? तुमच्याकडे कोणी आय विटनेस आहे का ?

निशा : आहे ना...! एक सोडून दोन.

पद्मा : कोण– मी ? (हसते) मला आणि अभिजितला यापुढे कुठलाच धोका पत्करायचा नाही. अभिजित काल तुरुंगातून सुटतो आणि आज रणजितचा खून होतो .. पोलिस निश्चितच या प्रकरणाशी अभिजितचा संबंध लावल्या-शिवाय राहणार नाहीत. तेव्हा आपण आपल्या कटाप्रमाणेच जायला हवं. घटस्फोटाच्या पेपर्सवर सह्या करून घ्या आणि आम्हाला आमचे पैसे देऊन मोकळं करा. उद्या हे प्रकरण उघडकीस आलंच, तर तुम्ही सांगू शकता... रणजित कर्जबाजारी होता, म्हणून आत्महत्या केली–

निशा : खोटं...तू मला खोटं बोलायला भाग पाडते आहेस.

पद्मा : एकदा खोटं बोललं की, ते लपवायला शंभर वेळा खोटं बोलावंच लागतं...

निशा : खरं आहे तुझं म्हणणं...

(अभिजित बाहेरून दिवाणखान्यात येतो. कपड्यांवरील धूळ झटकतो व क्रीझ नीट करतो.)

पद्मा : अभिजित, त्या विशेष कामगिरीसाठी मॅडमने आपल्यासाठी बोनस जाहीर केलाय...

अभिजित : आकडा सांगू नकोस. ऐकून दचकायचो मी.

पद्मा : म्हणून तर पैशाचा हिशोब माझ्याकडेच ठेवलाय. चल, सुब्रह्मणम् येण्यापूर्वी रंगीत तालीम करून टाक.

अभिजित : ते अजून आहेच का ?

पद्मा : म्हणजे काय ?... मी कॉफी करते... (कीचनमध्ये जाते)

(ती गेल्यानंतर अभिजित रणजितच्या नकलेचं मायमिंग करतो. रणजितचं उठणं–बसणं, एखाद्या कागदावर सही करणं वगैरे...काही क्षणांनंतर त्याचं लक्ष निशाकडे जातं...निशा त्याच्याकडे टक लावून पाहतेय हे त्याच्या लक्षात येतं. तो लहान पोराप्रमाणे ओशाळतो.)

निशा : गुड. कॅरी ऑन...

अभिजित : खरं सांगू का वहिनी, रणजितच्या मृत्यूमुळे माझा आत्मविश्वास वाढलाय.

निशा : भाऊजी, आत्मविश्वास हा चमत्कारिक प्रकार आहे. नसतो तोपर्यंत काहीच नाही. पण एकदा आत्मविश्वास आला, की मात्र त्याला सीमाच नसते.

अभिजित : अगदी खरं...आता ह्या सहीचंच बघा ना...जाणवतोय का फरक ?

निशा : (पाहून) एक्सेलंट ..आता मला तुमची भीती वाटतेय, भाऊजी.

अभिजित : काळजी करू नका. मी त्यातला नाही.

निशा : मला कल्पना आहे ! मी चेष्टा करत होते.

अभिजित : (संतापून) घरात मयत झालंय आणि तुला चेष्टा सुचतेय ? दळींदर...

( निशा दचकते. ) असं रणजित म्हणाला असता. वास्तविक; रणजितच्या निधनामुळे आपण सगळे कार्यक्रम स्थगित करायला हवे.

निशा : रणांगणावर सुतक पाळायचं नसतं... इथं कुणी कुणाचा भाऊ नाही...बाप नाही...गीता स्मरा—गीता.

( चेकबुकमधून चेक फाडते व अभिजितला देत...)

हा घ्या बेअरर चेक !

( बाहेर कार थांबल्याचा आवाज ऐकू येतो. )

सुब्रह्मण्यम् आलेत वाटतं...पद्मा...

( पद्मा किचनमधून बाहेर येते...तिच्या हातांत कॉफीचा ट्रे आहे. )

देवा परमेश्वरा, काम फत्तेह होऊ दे...तिरुपतीला येऊन माझे केस देईन.

(दार उघडायला बाहेर जाते.)

पद्मा : पती गेला म्हणून तिरुपतीला ?

( अभिजितला ) तो चष्मा काढ आधी.

(तो चष्मा काढतो. केस नीट करतो. डोअर बेल वाजते. निशा दार उघडते. सुब्रह्मण्यम् आत येतात. त्यांच्या हातात ब्रीफकेस आहे. त्यात टाईप केलेले पेपर्स आहेत. )

सुब्रह्मण्यम् : हॅल्लो...एव्हरीबडी...व्हेरी गुड आफ्टरनून टू यू...( अभिजितला ) काय मित्रा...काय म्हणतेय तुझी तब्येत ?

अभिजित : फर्स्ट क्लास ! मिस्टर सुब्रह्मण्यम...सकाळी मला तुमच्याशी नीट बोलता आलं नाही...त्याला कारण ती व्हिस्की .. जाम दलींदर स्टफ होता... पण आता मात्र मी फ्रेश आहे !

निशा : तुम्ही बसा ना, मि. सुब्रह्मण्यम् !

सुब्रह्मण्यम् : बसतो ना .. उभ्या उभ्या दोन मिनिटांत थोडंच आटोपणार आहे हे काम ? रणजित, अजूनही घटस्फोटासंबंधी तुझं मत ठाम आहे ?

अभिजित : ऑफकोर्स ! सकाळ-संध्याकाळ त्याच कटकटी ! दारू पिऊ नकोस, जुगार खेळू नकोस. हे करू नको, ते करू नको. ती दलिंदर सही कुठे करायची तेवढं सांगा.

सुब्रह्मण्यम् : मग हरकत नाही. पेपर्स तयार आहेत.

(ब्रीफकेसमधून पेपर्स काढतो. )

माझ्या समक्ष तुम्हा दोघांना सह्या कराव्या लागतील. त्यापूर्वी एकदा नजरेखालून घाला...

(पेपर्सची एक एक प्रत दोघांना देतो. )

( अभिजित आणि निशा पेपर्स चाळतात. मध्येच निशाचं लक्ष अभिजितच्या हाताकडे जातं... हातावर बॅण्डेज नाही, म्हणून तिची तारांबळ उडते. ती

खुणेनं पद्‌मालां सांगते. तिचाही गोंधळ उडतो. ती हळूच शोकेसकडे जाते व ड्रॉवरमधून बॅण्ड-एड काढते. ह्याचवेळेस अभिजित सोफ्यावर कंफर्टेबली बसण्याचा प्रयत्न करतो. उजवा हात सोफ्याच्या बॅकवर टाकतो. पद्‌मा ताबडतोब सोफ्याकडे जाते व त्याच्या तळहातावर बॅण्डएडची पट्टी चिकटवते.)

निशा : मि. सुब्रह्मण्यम्, तुम्ही कॉफी घेणार ना?

सुब्रह्मण्यम् : नो-थँक्स!

(अभिजित सही करतो.)

निशा : (सुब्रह्मण्यमूला) पेपर्स तयार करायचे तुमचे चार्जेस मात्र सांगा हं...

सुब्रह्मण्यम् : पन्नास हजार...

निशा : पन्नास हजार?

सुब्रह्मण्यम् : ह्यात वकिलाची फीसुद्धा आली.

निशा : एवढी कॅश माझ्याकडे नाहीए. मी चेकने पेमेन्ट केलं तर चालेल?

सुब्रह्मण्यम् : चालेल! पण त्या चेकवर नाव टाकू नका- म्हणजे चेक माझ्या खात्यात जमा करायचा की रामारावच्या खात्यात जमा करायचा, अजून ठरलं नाही आमचं...

(आता सुब्रह्मण्यमचं लक्ष अभिजितकडे जातं. त्याने सही केली आहे हे पाहतो.)

रणजित, घटस्फोटासारखी नाजूक आणि गंभीर बाब तू इतक्या सहजपणे मान्य करशील असं वाटलं नव्हतं.

अभिजित : काय करणार... सकाळ संध्याकाळ त्याच त्याच कटकटी... दारू पिऊ नकोस; जुगार खेळू नकोस... हे करू नको, ते करू नको... ती दलिंदर सही कुठे करायची सांगा...(अभिजितला आपली चूक लक्षात येते.)

सुब्रह्मण्यम् : (हातावरील पट्टीकडे लक्ष जातं...)

अरेच्या! तुझं बॅण्डेज कुठे गेलं?

अभिजित : अंघोळ करताना भिजलं, म्हणून ही बॅण्डएडची पट्टी लावली. मायनर कट आहे हो

सुब्रह्मण्यम् : मायनर कट? मला तर हा भयानक कट वाटतोय.

अभिजित : काय?... (कॉफीचा कप उचलतो व कॉफी पितो)

सुब्रह्मण्यम् : (आता त्यांच्या मनात संशय येऊ लागलाय) रणजित, तू कॉफी घेत नाही ना? .. हार्टसाठी कॉफी अपायकारक आहे. सतत कॉफी घेतल्याने आयुष्य कमी होतं... म्हणे! हे मात्र खरं असावं... माझी आयुष्यरेषा बघ... कारण मी कॉफी कधीच घेत नाही!

(निशाला तळहातावरील रेषा दाखवीत)

एका ज्योतिष्याने सांगितलंय मला...मी पंच्चाण्णव वर्षे जगणार... तुमचा हात बघू. ( निशा हात दाखविते) तुमची लाइफलाईनसुद्धा चांगली आहे ...आणि ही धनरेषा... माय गॉड ! मार्व्हेलस... ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत... पैसाच पैसा.

पद्मा : माझा हात बघा ना. (निशाच्या हाताकडे डोकावून पाहणाऱ्या पद्माचा हात घेतो. हात पाहून तोंड वाकडं करतो.)
तुझ्या हातात धनरेषाच नाही.

पद्मा : आयुष्यरेषासुद्धा नाही वाटतं ?

सुब्रह्मण्यम् : पद्मा, लवकरच तुझ्यावर आपत्ती येणार आहे, असं दिसतंय...अरे, हात कसा असावा... ? आमच्या ह्या मित्राचा हात बघा... (सहज अभिजितचा उजवा हात घेतो. अभिजितकडून थोडासा प्रतिकार होतो. तो मूठ आवळून धरतो. पण सोक्षमोक्ष लावून टाकावा ह्या दृष्टीने, सुब्रह्मण्यम् पूर्ण ताकदीने अभिजितची बोटं सरळ करतात व तळहातावरील पट्टी काढून) ह्या हातावरुन मी एक गोष्ट स्पष्टपणे सांगू शकतो. तू रणजित नाहीए. तू नक्कीच त्याचा भाऊ आहेस. अभिजित, तुझ्याबाबतीत रणजित मला एकदा बोलता होता. तुम्ही तिघांनी मिळून मला मूर्खात काढायचा कट रचला होता तर...
(डायव्होर्सपेपर्सवर झडप टाकतो व ते फाडून टाकतो. )
लक्षात ठेवा, मी मूर्ख नाही.
(फाडून टाकलेले पेपर्स अभिजितच्या तोंडावर फेकतो. )
(अभिजित आता अतिशय घाबरलेला आहे.)

अभिजित : हे असलं काहीतरी होणार याची खात्री होती मला...

निशा : सुब्रह्मण्यम्, रणजितचा माझ्या संपत्तीवर डोळा आहे. त्यासाठी त्याने माझा खूनही केला असता. म्हणूनच अभिजितचा आधार घेऊन मी हा कट रचला; पण...
(तिला पुढे बोलवत नाही. ती दोन्ही हातांनी तोंड झाकून घेते व रडते.)

सुब्रह्मण्यम् : (पद्माला) तुझं काय ?

पद्मा : माझं अभिजितवर प्रेम आहे. आम्हाला संसार मांडायचाय. पण ह्यांनी ( निशा ) आम्हाला पैशाचं आमिष दाखवलं, म्हणून–
( पुढे बोलू शकत नाही. तीही रडते. पद्मा व निशाला रडताना पाहून अभिजितलाही रडू कोसळते...)

सुब्रह्मण्यम् : काय सीन आहे... गंगा, जमना आणि ब्रम्हपुत्राला एकाचवेळी पूर आला. पण तिघांपैकी एकाहीकडे डोळे पुसायला हातरुमाल नाही... मी देऊ का ? (पॉझ ) रणजित हा बदमाश आहे, लफंगा आहे... हे मी मान्य

करतो; पण ह्या परिस्थितीत पुढे मी काय करायचं?

(पॉझ) (सुब्रम्हण्यम पुढे काय बोलणार याची तिघांनाही उत्सुकता. नंतर पद्‌मा व अभिजितला)

ठीक आहे... तुम्ही दोघं ताबडतोब मुंबई सोडून बाहेरगावी निघून जा. तुमचा ह्या कटात काडीचाही संबंध नव्हता; असं मी समजून घेईन...

अभिजित : (आपल्याला एक जीवदान मिळालंय, म्हणून तो एक्साइट होतो... त्या एक्साईट्‌मेन्टमध्ये तो भडाभडा बोलू लागतो.)

थँक्यू साहेब... तुम्ही देवमाणूस आहात... मी प्रामाणिकपणे सांगतो... मला ह्या कटात सामील व्हायचंच नव्हतं. पण ह्या दोघींनी मला अड-कवलं... ठरवलं एक आणि घडलं भलतंच... बिचारा रणजित– केवढा चलाख, चतुर आणि चालू माणूस... पण त्यालासुद्धा थांगपत्ता लागू दिला नाही! केसाने गळा कापला की हो!

(सुब्रह्मण्यम् ह्या वाक्यावर रिॲक्ट करतात– पद्‌मा व निशा काळजीत पडतात)

पण तोही लेकाचा त्याच लायकीचा होता. कधीतरी पापाचा घडा भरतोच की हो!

(सुब्रम्हण्यम् लक्षपूर्वक ऐकतो. पद्‌मा व निशा काळजीने एकमेकींकडे पाहतात) साहेब, खरं सांगतो. रणजितची वृत्तीच घाणेरडी होती... माझा सख्खा भाऊ होता, पण त्यापेक्षा वैरी परवडला हो!

सुब्रम्हण्यम्: जस्ट ए मिनिट. रणजितचा उल्लेख तुम्ही अशा विचित्र पद्धतीने का करताय? तो त्याच लायकीचा होता... म्हणजे त्याने आता जगाचा निरोप घेतलाय का? (आपण काहीतरी भयानक बोलून गेलोय; हे अभि-जितच्या लक्षात येतं.)

निशा : अभिजितला म्हणायचंय की, आता रणजित पार बदलून गेलाय... म्हणजे पूर्वीचा रणजित... आत्ताचा रणजित...

सुब्रम्हण्यम् : पण तो आहे कुठे? पणजीहून तो परतलाय का?

(कोणी काहीच बोलत नाही...)

तुम्ही लोकांनी त्याचा निकाल लावलाय का? (पॉझ) प्रामाणिकपणे कबूल करा... तुम्ही रणजितचा खून केलाय की नाही? (शेवटचे वाक्य अभि-जितवर भडिमार केल्याप्रमाणे.)

अभिजित : आता ओरडून उपयोग काय? वर केलेला माणूस परत येणार आहे का?

सुब्रम्हण्यम् : काय?

अभिजित : ॲक्सिडंटमध्ये माणसं मरत नाहीत का?

निशा : सुब्रम्हण्यम्, रणजितने माझ्यावर पिस्तुल रोखलं... आमच्यात झटापट

झाली...पिस्तुलातून गोळी सुटली. आणि तो —

सुब्रम्हण्यम् : मेला... ! पण त्याच्या डेडबॉडीचं काय केलं !

पद्मा : विहिरीत टाकली.

निशा : (अभिजित व पद्माकडे बोट दाखवून) ह्या दोघांनी—

सुब्रम्हण्यम् : माय गॉड ! धंदेवाईक मारेकऱ्याच्या वरताण धाडस केलंत तुम्ही. ह्या प्रकरणाकडे दुर्लक्ष केलं,तर उद्या माझा खून व्हायचा. ताबडतोब पोलिसांना कळवायला हवं...

(फोनच्या दिशेने जातो. फोन उचलून डायल फिरवतो. पद्मा ड्रोअरमधून रणजितकडे असलेले पिस्तुल काढते व सुब्रम्हण्यमवर रोखते.)

पद्मा : ओ मिस्टर, फोन खाली ठेवा. (सुब्रम्हण्यम् फोन खाली ठेवतात.) नाऊ; हॅण्डस् अप (ते हात वर करतात) तुम्हा लोकांना वेगळं सांगायची गरज आहे का ? (निशा व अभिजितला) हॅण्डस् अप.

निशा : आम्हीसुद्धा हॅण्डसप... ?

पद्मा : सांगितलेलं काम करायचं... (अभिजितला) बाळा, हात वर कर... (लहान पोराला सांगत असल्याप्रमाणे)

अभिजित : पण मी तर तुझंच बाळ आहे ना ? आय मीन माणूस... ?

पद्मा : तू कुणीही नाही माझा. हात वर कर, नाहीतर पाय वर करायला लावीन... (अभिजित हात वर करतो) आता मागे सरक... (निशा व सुब्रम्हण्यम् पुढे येतात.) त्याला मागे सरकायला सांगितलंय; म्हणून तुम्ही पुढे सरकताय का ? व्हा मागे...

निशा : पद्मा, मूर्खपणा करू नकोस.

पद्मा : कधी केलाय का ? ते काम तुमचं आहे. तुमच्याआधी माझं कारस्थान ह्या घरात सुरू झालं होतं. (अभिजितकडे बोट दाखवून) आधी ह्याला प्रेमाचं आमिष दाखवून माझ्या ताटाखालचं मांजर केलं... तुरुंगातून आलेलं पत्र तुमच्यापर्यंत पोचवायचं कामसुद्धा माझंच... दोन्ही भाऊ दिसायला सारखेच आहेत; हे गुपित मीच तुम्हाला सांगितलं. त्या आधारावरच मी तुम्हाला एक योजना आखायला भाग पाडलं.... कारण रणजितप्रमाणेच माझाही तुमच्या संपत्तीवर डोळा होता.

अभिजित : ओह नो -

पद्मा : ओह येस. चल, आता वेळ न लावता तुझ्या खिशातला ५० हजाराचा बेअरर चेक काढ.

(अभिजित चेक पद्माकडे देतो.)

आणि मॅडम, तुम्हीही कामाला लागा. ५० हजारांचा शेवटचा हप्ता अजून शिल्लक आहे. पेमेंट स्टॉप करायचा प्रयत्न केलात, तर सरळ पोलिस-

स्टेशनला जाऊन विहिरीची झडती घ्यायला लावीन...चला, कामाला लागा.
(निशा घाबरत घाबरत चेक लिहिते व तो चेक सोफ्यावर ठेवते– पद्मा तो चेक उचलते.)

सुब्रम्हण्यम् : पद्मा, पैसे घेऊन मी लोकांना सल्ला देतो; पण तुला मात्र फुकटात सल्ला देतोय... इथून पळून गेलीस, तर रणजितच्या खुनासाठी पोलिस तुला जबाबदार ठरवतील.

पद्मा : भीती दाखवताय मला ? हातात काय आहे पाह्यलं ?
(सुब्रम्हण्यम् दोन पावलं पुढे जातात.)

निशा : (त्यांना मागे खेचत) तुम्ही पुढे जाऊ नका–

पद्मा : (सुब्रम्हण्यम्ला) त्या बाईचं ऐका... विहिरीत जागा नाहीए आता.

सुब्रम्हण्यम् : (पुढे जात) माझी काळजी करू नकोस. मला कुठेही जागा मिळेल. चल; ते रिव्हॉल्व्हर माझ्याकडे दे...

पद्मा : मागे व्हा... नाहीतर...

सुब्रम्हण्यम् : गोळया झाडशील ?
(पद्मा रिव्हॉल्व्हर झाडते. गोळी सुब्रम्हण्यमच्या छातीत लागते. त्यांची तडफड सुरू होते व प्राण गेल्याप्रमाणे ते जमिनीवर कोसळतात.)

अभिजित : बिचारा ! ९५ वर्षं जगणार होता...

निशा : काय केलंस तू हे, पद्मा...? प्रकरण अधिक गुंतागुंतीचं करून टाकलंस !

पद्मा : उलट गुंता सोडवलाय मी ! जो माणूस आपल्याला पोलिसांच्या स्वाधीन करू शकला असता, त्याचा आपण निकाल लावलाय... शाबासकीचा आणखी एक चेक लिहायला हवा तुम्ही...

निशा : पैशांसाठी तू ह्या थराला गेलीस ?

अभिजित : आता आपलं काय होणार ?

पद्मा : मी सर्वांचे मार्ग मोकळे केलेले आहेत... कुणीही कुठेही जावं...

अभिजित : मला बहुतेक तुरुंगातच जावं लागेल !

पद्मा : चला... विहिरीत थोडी जागा शिल्लक आहे... सुब्रम्हण्यम्ला ढकलून द्या त्या विहिरीत !

अभिजित : आता तर मी मुळीच हात लावणार नाही !

पद्मा : तुझा बा लावेल...! गधड्या, हे सगळं तुझ्यामुळेच तर झालं ! कुठे बोलायचं.. किती बोलायचं... केव्हा बोलायचं... केव्हा थांबायचं– काही कळतं का तुला ? तोंडाकडे काय पाहतोयस माझ्या ? उचल ते धूड–
(सुब्रम्हण्यम्ची बॉडी अभिजित बाहेर घेऊन जातो.)
चला; मॅडम, मी आता तुमचा निरोप घेतेय. गुडबाय... माझी बॅग... घेऊन आलेच हं...

(किचनमध्ये जाते... ती गेल्यानंतर, निशा काहीतरी सुचल्याप्रमाणे किचनच्या दारापर्यन्त येते व दार बाहेरून लॉक करते... कडी लावते... धावत फोनकडे येते व डायल फिरविते.)

निशा : (फोनमध्ये) हॅलो... मालाड पोलिस स्टेशन? हॅलो... मी निशा परदेशी ...मार्वे रोड, मालाडहून बोलतेय... मी एका भयानक संकटात सापडलेय ... निशा... निशा परदेशी... ओळखलंत? थँक्यू... कुठलं संकट? अहो, काय सांगू... इथे संकटांची सिरियल चालू आहे. "पोलिस फाईलसे" से नाही हो...

पद्मा : (किचनमधून ओरडत) दरवाजा उघडा, मॅडम... दरवाजा उघडा... दरवाजा उघडा...

निशा : (फोनमध्ये) तुम्ही लवकरात लवकर या... ऑलरेडी दोन खून झालेले आहेत...पोलिस येण्यापूर्वी आणखीन दोन खून व्हायची शक्यता आहे... मी असं का म्हणतेय?... कारण तुम्ही सगळं संपल्यावर पंचनामा करायला येता म्हणून... (फोन खाली ठेवते व बेडरूममध्ये पळते.)

(आतून पद्मा "दरवाजा उघडा– दरवाजा उघडा–" ओरडून सांगत असताना, बाहेरून अभिजित दिवाणखान्यात येतो व पद्माचा आवाज ऐकतो– तो दरवाजा उघडतो–पद्मा बाहेर येते. तिच्या हातात अभिजितची सूटकेस आहे– हातात रिव्हॉल्व्हर आहे. बेडरुमच्या दिशेने जाते व नंतर विचार करून अभिजितबरोबर ती बाहेर पळून जाते.)

**दुसरा अंक समाप्त**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 22505 नों. दि. 5/5/88
वि. नाटक क्र. ..............

# अंक तिसरा

स्थळ : तेच

वेळ : एका तासानंतरची

( पडदा उघडण्यापूर्वी पोलिस-सायनरचा आवाज- त्याच्या पाठोपाठ जीप थांबण्याचा आवाज- पडदा उघडतो, तेव्हा पोलिस इन्स्पेक्टर सूर्यवंशी व हवालदार दिवाणखान्यात दिसतात. निशा सोफ्यावर बसलेली आहे. ती अतिशय घाबरलेली आहे. एकूण भयभीत वातावरण. इन्स्पेक्टर सूर्यवंशी स्टेटमेन्ट घेत आहेत, तर हवालदार त्याची नोंद करीत आहेत; असे दृश्य)

इन्स्पेक्टर : आणि त्यानंतर तुम्ही मला फोन केला... बरोबर ?... मला फोन केला तेव्हा तुमची मोलकरीण कुठे होती... ?

निशा : ती तिचं सामान आणायला कीचनमध्ये गेली होती.

इन्स्पेक्टर : आणि तुमचा दीर ?

निशा : तो त्या सुब्रम्हण्यमचं प्रेत विहिरीत टाकायला गेला होता. मी कीचनच्या दाराला बाहेरून कडी लावली आणि तुम्हाला फोन केला... त्यानंतर मी बेडरूममध्ये गेले; आतून कडी लावली आणि बाहेरचा कानोसा घेत राह्यले—

(इन्स्पेक्टर एका हवालदाराला बेडरूममध्ये पाहायला सांगतो- तो बेड-रूमच्या दिशेस जातो.)

थोड्या वेळाने अभिजित इथं आला, पद्माने त्याला दरवाजा उघडायला सांगितलं. आणि पोलीस इथं येणार म्हणून त्या दोघांनी इथून पळ काढला.

इन्स्पेक्टर : पण बाई, तुमचा फोन आल्यानंतर आम्ही अक्षरशः पाच मिनिटांत इथं आलो.

निशा : हँ... त्या सुब्रम्हण्यमच्या गाडीच्या किल्ल्या पद्मा जवळ होत्या. बहुतेक ते त्यांच्या गाडीतच पळाले असावेत.

इन्स्पेक्टर : गाडीचा नंबर ?

निशा : नाही इन्स्पेक्टर... गडबडीत नंबर बघायला विसरले मी...

हवालदार : काय ? गाडीचा नंबर माहीत नाही ?

इन्स्पेक्टर : इट्स ऑल राईट, मिसेस परदेशी... इथं घडलेला सगळा प्रकार तुम्ही आम्हाला सांगितला; आम्ही तो लिहूनही घेतलाय...आता तुमची हरकत नसल्यास आपण ह्यातला प्रत्येक मुद्दा वेरीफाय करू... काय ? अँज पर युवर स्टेटमेन्ट; तुमचे पती मि. रणजित शंकर परदेशी ह्यांचा तुमच्या संपत्तीवर डोळा होता. इतकेच नव्हे, तर त्यांच्यापासून तुमच्या जिवाला धोका होता; राईट ?

निशा : तुम्हाला आठवतं का, मिस्टर सूर्यवंशी... पंधरा दिवसांपूर्वी मी आणि रणजित आमच्या गाडीतून जात असताना; आमची गाडी एका झाडावर आदळली होती... ?

इन्स्पेक्टर : यस ! तुमच्या गाडीचे ब्रेक्स फेल झाले होते... बाय चान्स माझी जीप तुमच्या गाडीच्या पाठोपाठ होती... आठवलं !

(बेडरुममध्ये गेलेला हवालदार बाहेर येतो.)

हवालदार : आत कुणीही नाही, साहेब !

इन्स्पेक्टर : सगळ्या खोल्यांची झडती घ्या ! संशयाची एकही जागा शिल्लक ठेवू नका. गॅरेज, आऊट हाऊस, टॅरेस, गार्डन... संपूर्ण प्रॉपर्टी पालथी घाला... (एक हवालदार कीचनकडे जातो– दुसरा हवालदार बागेकडे जाणाऱ्या दारातून बाहेर जातो– बाहेरच्या इतर पोलिसस्टाफला उद्देशून ) जगदाळे... त्या कदमांना म्हणावं; व्हॅनमध्येच बसून रहा आणि स्टेशनशी सतत कॉन्टॅक्ट ठेवा... तशीच काही महत्त्वाची इन्फरमेशन असल्यास मला ताबडतोब कळवा... क्राईम ब्रँचला इथला फोन नंबर कळवलाय का ? (बाहेरून " होय साहेब " असं उत्तर दिलं जातं) मिसेस परदेशी... ह्या स्टेटमेन्टवर सही करण्यापूर्वी पुन्हा एकदा विचार करा... तुम्ही तुमच्या मिस्टरांना पैसे द्यायचं नाकारलंत, तेव्हापासून त्यांनी तुम्हाला वाईट वागणूक द्यायला सुरुवात केली– बरोबर ?

निशा : होय इन्स्पेक्टर,...रात्री-अपरात्री दारू पिऊन यायचा, शिवीगाळ करायचा, मारझोड करायचा–

इन्स्पेक्टर : ह्याचाच अर्थ; वाईट वागणूक द्यायचा ! बाकीच्या डिटेल्स तुम्ही कोर्टात सांगा.

निशा : इन्स्पेक्टर...त्याचा एक भाऊ आहे हेदेखील त्याने मला सांगितलं नव्हतं.

इन्स्पेक्टर : अभिजित– जो तुरुंगातून सुटून नुकताच इथं आला !

निशा : तिहार जेलमधून ! इन्स्पेक्टरसाहेब, ह्या दोघा भावांत इतकं साम्य आहे,

की बघणारा संभ्रमात पडल्याशिवाय राहणार नाही.

इन्स्पेक्टर : आणि त्यांच्यातल्या ह्या साम्याचा गैरफायदा घ्यायचा तुम्ही ठरवलं. एका मोलकरणीच्या मदतीने त्याला तोतया रणजित म्हणून उभा केला. तुम्हाला घटस्फोट मिळावा, म्हणून एका वकिलासमोर त्याने खोटी सहीसुद्धा केली. राईट ?

निशा : होय, इन्स्पेक्टर...

इन्स्पेक्टर : मॅडम, धिस इज फ्रॉड! बनवाबनवीच्या आरोपाखाली, कायद्याप्रमाणे तुम्हालाही शिक्षा होऊ शकते.

निशा : दुसरा मार्गच नव्हता, इन्स्पेक्टर–

इन्स्पेक्टर : ॲनीवे... कोर्ट तुमचा हा मुद्दा विचारात घेईलच म्हणा... ह्याचा अर्थ; तुम्ही तुमच्या मिस्टरांचा खून केला आहे; असाही होऊ शकतो.

निशा : तो खून नव्हता, इन्स्पेक्टर... उलट त्याने त्याच्या भावाचा खून करू नये, म्हणून मी त्याला अडवलं; आमच्यात झटापट झाली आणि पिस्तुलातून गोळी सुटली . काय झालं क्षणभर मला कळलंच नाही. पण घडलं ते असं घडलं !

इन्स्पेक्टर : हा प्रकार घडला तेव्हा घरात दोनच माणसं होती... त्यापैकी एक गेला, उरलात तुम्ही... अगेन नो आय विटनेस! तुमच्या मिस्टरांची डेड-बॉडी विहिरीत कुणी टाकली ?...

निशा : त्या दोघांनी– अभिजित आणि पद्मा !

इन्स्पेक्टर : तुम्ही हातसुद्धा लावला नाही ?

निशा : नाही.

इन्स्पेक्टर : ह्या स्टेटमेन्टवर सही करा! (निशा सही करीत असताना) घाबरू नका; तुम्ही दिलेलं स्टेटमेन्ट शंभर टक्के खरं असेल तर, अभिजित आणि पद्मा इथून फार लांब जाऊ शकणार नाहीत. आम्ही सगळीकडे नाकेबंदी केली आहे. ते नक्कीच पकडले जातील.

(ह्याच वेळेस किचनमधून पहिला हवालदार बाहेर येतो.)

हवालदार : (किचनमध्ये संशयास्पद काहीच नाहीए; असं खुणेनं सांगून मेन डोअर-मधून निघून जातो.)

इन्स्पेक्टर : नाऊ रिलॅक्स, मिसेस परदेशी... कसलाही आडपडदा न ठेवता तुम्ही पोलिसांना सत्य-परिस्थिती सांगितली, त्यामुळे आमचं काम अधिकच सोपं झालंय...

(बागेकडे गेलेला हवालदार आत येतो.)

हवालदार : बाहेर कुणीच नाही, साहेब.

इन्स्पेक्टर : विहिरीत पाह्यलं ?

हवालदार : विहीर ? कुठे साहेब ?

निशा : तारेच्या कुंपणाला लागूनच विहीर आहे. ( हवालदार निघतो. )

इन्स्पेक्टर : नुसती विहीर पाहू नका... आत नीट डोकावून पहा... ( निशाला) बरं, आता मी कॉरोनरला फोन करून त्या दोन्ही डेडबॉडींचा ताबा घ्यायला सांगतो. (फोन करायला पुढे जातो इतक्यात; मेन डोअरकडे गेलेला हवालदार आत येतो व एक लहान कागदाचा तुकडा किंवा चिठ्ठी देऊन बाहेर जातो.)

इन्स्पेक्टर : ( त्यातील मजकूर वाचून) माय गॉड ..

निशा : काय झालं, इन्स्पेक्टर साहेब ?

इन्स्पेक्टर : तिहार जेलच्या अधिकाऱ्यांशी नुकतंच आमचं बोलणं झालंय ! अभिजित परदेशी नावाच्या कैद्याची कुठेच नोंद नाही !

निशा : ( रीएक्ट करते व नंतर ) अहो, जवळपास त्यांची ब्रॅन्च असेल... तिथं चौकशी करा म्हणावं !

इन्स्पेक्टर : बाई, बॅंकेची ब्रॅन्च असते, तुरुंगाची शक्य आहे का ?

निशा : नाही; म्हणजे दिल्लीच्या आसपासच्या शहरांत–

इन्स्पेक्टर : दिल्ली... आग्रा मथुरा . काशी सगळीकडे चौकशी केलीय.

निशा : पण; “ तुरुंगातून सुटून आलो आहे ” असं अभिजित खोटं कशाला सांगेल ?

इन्स्पेक्टर : यस... खोटं बोलण्यामागचा त्याचा हेतू काय असेल... ?
( फोनची बेल वाजते )

निशा : ( फोन घेते) हॅल्लो...हो आहेत... इन्स्पेक्टर सूर्यवंशी, तुमचा फोन आहे.

इन्स्पेक्टर : (फोन घेऊन ) यस, इन्स्पेक्टर सूर्यवंशी हिअर...बोल राऊत...काय . ? नक्की... ? तू स्वतः संपूर्ण लिस्ट चेक केलंस... ? थॅंक्यू , राऊत .. सी यू... बाय... ( फोन खाली ठेवतो ) आणखी एक खळबळजनक बातमी...! गेल्या अठ्ठेचाळीस तासांत रणजित परदेशी नावाच्या माणसाने इंडिअन एअरलाईन्सच्या विमानाने कुठेही प्रवास केलेला नाही.

निशा : पण ते कसं शक्य आहे... ? त्याने मला गोव्याहून फोन केला होता– मी ऑपरेटरशी बोलले सुद्धा...

इन्स्पेक्टर : ऑपरेटर ? तुमचा काहीतरी गोंधळ होतोय .. गोव्याला डायरेक्ट फोन आहे... ऑपरेटरशी बोलायचा प्रश्नच येत नाही !

निशा : ओह, आय सी ! .. ह्याचा अर्थ काय इन्स्पेक्टर... ?
(दुसरा हवालदार आत येतो. पुन्हा तशीच चिठ्ठी देऊन बाहेर जातो. )

इन्स्पेक्टर : (मॅसेज वाचत) नरीमन पॉईंटच्या मित्तल चेंबर्समध्ये लीगल ॲडव्हायझर व्ही. सुब्रम्हण्यमचं कुठेही ऑफिस नाही !

(टेलिफोनची बेल वाजते- निशा फोनकडे जाते- तिला इन्स्पेक्टर थांबवतो.) थांबा... तो बहुतेक माझा फोन असेल—
(फोन घेतो) हॅल्लो... इन्स्पेक्टर सूर्यवंशी हीअर... यस... कोण ? सावंत... ? बोल, मी तुझ्याच फोनची वाट पाहत होतो... ब्युरो ऑफ रेकॉर्डस्‌कडून काही इन्‌फर्मेशन मिळाली का ?... काय ? नक्की... हँ... बट हाऊ डिड यू कन्‌फर्म... ? ...ओह, आय सी... थँक्यू , सावंत... महत्त्वाची इन्‌फर्मेशन दिली आहेस तू मला... बाय... (फोन खाली ठेवतो.)

निशा : (उत्सुकतेनं) काय बातमी आहे, इन्स्पेक्टर...?

इन्स्पेक्टर : जन्म-मृत्यु नोंदणी विभागात अभिजित परदेशी नावाच्या माणसाचं रेकॉर्डच नाहीए...

निशा : ते इथं कसं असेल...? गोव्याला असेल !

इन्स्पेक्टर : ब्युरो ऑफ रेकॉर्डसच्या माहितीप्रमाणे, तुमचे मिस्टर रणजित परदेशी ह्यांना भाऊच नाही !

निशा : काय ? त्यांना भाऊच नाही ? मग अभिजित... ?
(पहिला हवालदार आत येतो.)

हवालदार : साहेब, विहिरीत काहीच नाहीए... स्वच्छ काचेसारखं पाणी आहे ! अगदी तळापर्यंत दिसतंय... !

निशा : नाही, इन्स्पेक्टर... हा खोटं बोलतोय... ही इज लायर...
(इन्स्पेक्टर खुणेनं हवालदारास बाहेर जायला सांगतो- तो बाहेर जातो- स्टेटमेन्ट हातात घेऊन इन्स्पेक्टर-)

इन्स्पेक्टर : मिसेस परदेशी... आपण दिलेल्या ह्या स्टेटमेंटचा पुनश्च एकदा शांतपणे विचार करावा, असं नाही वाटत तुम्हाला... ?

निशा : नाही. काही गरज नाही.

इन्स्पेक्टर : गरज आहे ! मी सांगतो ना... तुम्ही म्हणताय; तिहार जेलमधून इथं एक पत्र आलं-

निशा : (किंचित वैतागून) मला नाही...पद्‌माला...

इन्स्पेक्टर : तेच ते ! कुठे आहे ते पत्र ?

निशा : तुम्हाला सांगितलं ना...तिनं ते जाळून टाकलं...म्हणजे त्यानंच ते पत्र पद्‌माला जाळायला लावलं...

इन्स्पेक्टर : बरं; ती मोलकरीण कुठे आहे ?

निशा : तुम्हाला एकदा सांगितलं ना; ती त्याच्याबरोबर पळून गेली म्हणून—

इन्स्पेक्टर : अभिजितबरोबर ? जो माणूस अस्तित्वातच नाहीए; त्याच्याबरोबर ती पळून गेली ?...तुम्ही म्हणताय; तुमचे मिस्टर काल दुपारच्या फ्लाईटने गोव्याला

गेले. पण पॅसेंजर्स लिस्टमध्ये त्यांचं नावच नाहीए...विमानात त्यांनी विदाऊट प्रवास केला का?

निशा : अहो, पण त्यांच्या जाण्या-येण्याचा खर्च सुब्रह्मण्यम् करणार होते--

इन्स्पेक्टर : आता ह्या सुब्रह्मण्यमचंच घ्या ना...ह्या नावाच्या माणसाचं मित्तल चेंबर्स-मध्ये ऑफिसच नाहीए!...आणि तुमचा सर्वात विनोदी मुद्दा म्हणजे, विहिरीत टाकलेल्या दोन डेड-बॉडीज...कुठे गेल्या त्या? वाहून गेल्या की पाण्यात विरघळून गेल्या? चला...बसा. मी नवीन स्टेटमेन्ट करायला घेतोय...

निशा : नाही इन्स्पेक्टर, मी सांगितलेलं अक्षर न् अक्षर खरं आहे...मी पाह्यलंय सगळं...

इन्स्पेक्टर : कुठे? स्वप्नात? अशा दिवसा-ढवळ्या पडणाऱ्या स्वप्नाला काय म्हणतात माहीत आहे? भास...हॅल्युसिनेशन्स...

निशा : तुम्ही काय मला वेडी समजताय्? पण लक्षात ठेवा- मला वेड लागणं शक्य नाही!

इन्स्पेक्टर : बरोबर! तुम्ही आम्हाला वेड लावाल हो!

निशा : तसं नाही, इन्स्पेक्टर, पण मी त्या व्हिस्कीमध्ये झोपेच्या गोळ्या टाकल्या होत्या, त्यामुळे--

इन्स्पेक्टर : हे आणखीन एक उपकथानक!...झक मारली आणि इथं बदली करून घेतली...

(दुसरा हवालदार आत येतो.)

हवालदार : साहेब, बाहेर एक माणूस आलाय; त्याला आत यायचंय्.

इन्स्पेक्टर : कोण आहे? नाव विचारलं त्याचं?

हवालदार : रणजित परदेशी!

निशा : शक्यच नाही...त्याला तर मी--

इन्स्पेक्टर : (निशाला) तुम्ही एक्साइट होऊ नका! (हवालदारास) आत पाठव त्यांना.

(हवालदार बाहेर जातो—पॉझ—)

(—काही क्षणांनंतर रणजित आत येतो— )

रणजित : (निशाला) काय भानगड आहे, डार्लिंग...? बाहेर पोलिसांची जीप आहे. वायरलेस आहे...पोलिस का आलेत इथं ..?

(इन्स्पेक्टरकडे लक्ष जातं) ओह! इन्स्पेक्टर सूर्यवंशी...फ्रॉम मालाड पोलिस स्टेशन...राईट? व्हॉट इज द् मॅटर, इन्स्पेक्टर...?

इन्स्पेक्टर : काही नाही; सहज आलो होतो! आता तुमची तब्येत कशी आहे? (निशाला) हेच तुमचे मिस्टर ना?

निशा : कमाल आहे!

रणजित : त्यात कसली कमाल? पण डार्लिंग, तू अशी का पाहते आहेस माझ्याकडे?

निशा : तू इथं...ह्या घरात मरून पडला होतास ना...? तुझ्या हातावरचं बॅण्डेज कुठे आहे...? नाही, तू रणजित नाहीए–

रणजित : ओह, माय गॉड!...इन्स्पेक्टर, माझ्या बायकोला पुन्हा तसाच अॅटॅक आलाय. माझी बायको मनाचं संतुलन गमावून बसली आहे...! ह्या अवस्थेत शक्य तो तिच्याशी वाद न घातलेलाच बरा!...काय म्हणणं आहे तिचं?

इन्स्पेक्टर : मलाच काही कळलेलं नाहीए...तुम्हाला काय कप्पाळ सांगणार? मिस्टर परदेशी, ह्यांनी मला एक सुरस आणि चमत्कारिक गोष्ट सांगितली–– दोन खुनांची–

रणजित : यू मीन मर्डर...? (निशाला) डार्लिंग, मी तुला कितींदा सांगितलंय; तू डिटेक्टीव्ह पुस्तकं वाचत जाऊ नकोस... तुझी तबियत बरी नसते अलीकडे!

इन्स्पेक्टर : ह्या गोष्टीमध्ये; तुमचा स्वतःचा खून झालाय आणि तुमच्या भावाचासुद्धा समावेश आहे, बरं का––

रणजित : मला भाऊ आहे कुठे?

इन्स्पेक्टर : ते मला माहीत आहे हो...बरं, तुम्ही सुब्रह्मण्यम् नावाच्या माणसाला ओळखता का...?...कोर्टाची कामं हाताळतो म्हणे–

रणजित : सुब्रह्मण्यम् . ? नाही बुवा...कोर्ट-कचेऱ्यांशी आपला काय संबंध!

निशा : खोटं! साफ खोटं! इन्स्पेक्टर, हा माणूस लबाड आहे...लफंगा आहे... माझ्याविरुद्ध इथं कट शिजतोय; आणि तू त्या कटाचा सूत्रधार आहेस, रणजित!

रणजित : निशा डार्लिंग, माय स्वीट हार्ट...शांत हो... (निशा आरडाओरड करते.) (तो तिला जवळ घ्यायचा प्रयत्न करतो; पण निशा त्याला आपल्यापासून लांब करते. रणजित तिला बळजबरीने सोफ्यावर बसवतो. खिशातून एक लहानशी बॉटल काढून ती बॉटल निशाच्या नाकाजवळ धरतो. निशावर त्या औषधाचा परिणाम होतो. ती बेशुद्ध अवस्थेत शांतपणे पडून राहते.)

इन्स्पेक्टर : तुम्ही एखाद्या चांगल्या डॉक्टरला का नाही दाखवत?

रणजित : खूप डॉक्टर्स झालेत! सर्वांनीच हात टेकलेत! आता शेवटचा उपाय, म्हणून डॉ. दीक्षितांची ट्रीटमेन्ट सुरू केली आहे. ही इज वेल नोन सायकोथेरापीस्ट फ्रॉम लंडन!

इन्स्पेक्टर : तुमच्या मिसेस एका मोलकरणीबद्दलही सांगत होत्या...काय बरं नाव; (पेपर्स पाहत) पद्मा––

रणजित : पद्मावती !...अहो, दोन महिन्यांपूर्वीच ती इथून सोडून गेली ! वास्तविक हिच्या त्रासाला कंटाळून, नाइलाजाने ती गेलीय ! पण तिच्याऐवजी मी एक नर्स ठेवलीय...( घरात चारही बाजूला पाहत) चारू...चारू ..

इन्स्पेक्टर : मी आलो तेव्हा घरात कुणीच नव्हतं !

रणजित : मग ही गेली कुठे ?

(ह्याच वेळेस बाहेर दोन हवालदारांचा व एका बाईचा मोठमोठ्याने बोलण्याजा आवाज ऐकू येतो– बाई इतरांबरोबर भांडतेय. ही बाई दुसरी-तिसरी कुणी नसून; पद्माच आहे.)

पद्मा : ( बाहेरून) मला आत सोडताय की नाही; तेवढं सांगा...इथं माझी ड्यूटी आहे...मला आत जाऊ द्या...

हवालदार : (बाहेरून) काही पुरावा आहे का तुमच्याकडे ?

पद्मा : पुरावा ? आहे. तुमच्या साहेबांना पाठवा माझ्याकडे !

(पद्मा दिवाणखान्यात प्रवेशते... ती आता संपूर्ण नर्सच्या वेशात आहे. पांढरा फ्रॉक, हेडगीअर...पांढरे सॅण्डल्स...फ्रॉकवर ब्ल्यू बेल्ट...मनगटावर घड्याळ...हातांत एक कागद आहे व औषधाच्या बॉटल्स...ती भयंकर संतापलेली आहे. )

मिस्टर परदेशी...हा काय चावटपणा ?

रणजित : आय ॲम सॉरी, सिस्टर...निशाला पुन्हा तसाच ॲटॅक आलाय...ह्या खेपेस तिनं चक्क पोलिसांनाच बोलावलंय !

निशा : (शुद्धीत आल्याप्रमाणे) कोण--पद्मा--?

चारुलता : सॉरी मॅडम, मी जाणार नव्हते...पण तुमची औषधं संपली, म्हणून बाहेर पडले !

निशा : ( इन्स्पेक्टरला एका कोपऱ्यात नेत ) अहो; हीच ती पद्मा !

चारुलता : मला ह्या ' पद्मा ' म्हणून का बोलवत आहेत ?

निशा : अहो, ही आमची मोलकरीण पद्मा ! आज सकाळपर्यंत आमच्याकडे भांडी घासत होती...आणि आता चक्क नर्सचा पोशाख घालून मिरवतेय ! इन्स्पेक्टर, इकडे या...तिच्याकडे काही पुरावा आहे का विचारा...विचारा ना...

इन्स्पेक्टर : तुमच्याकडे तुमच्या हॉस्पिटलचं किंवा असोसिएशनचं आय-कार्ड आहे का ? आय मीन–पुरावा...?

( पद्मा खिशातून आय-कार्ड काढून दाखवते.)

' मिस. चारुलता एम. कुलकर्णी...रेड-क्रॉस सर्विसेस...' थॅंक्यू ! गैरसमज करून घेऊ नका, मिस. कुलकर्णी...इट्स पार्ट ऑफ माय ड्यूटी.

रणजित : (पद्माला) मिस चारु...कितींदा सांगितलंय तुम्हाला; मॅडमला ह्या अवस्थेत एकटीला टाकून कुठेही जात जाऊ नका—

चारुलता : त्यांची औषधं संपली होती, म्हणून आणायला गेले होते. पण जाण्यापूर्वी सिडेटीव्हची टॅबलेट दिली होती मी !

निशा : बंद करा ही नाटकं...तुम्ही काय मला वेडी समजताय ?

चारुलता : मॅडम—

निशा : शट अप ! यू ब्लडी बीच-

चारुलता : मिसेस परदेशी, शांत व्हा. नाहीतर मला औषधाचा डोस द्यावा लागेल !

निशा : इन्स्पेक्टर, ही मला डोस देतेय डोस !

चारुलता : नाइलाजाने 'ते' इंजेक्शन द्यावं लागेल... आरडाओरड कायमची बंद करून टाकीन...कळलं ?

(बाहेर कार थांबल्याचा आवाज ऐकू येतो.)

रणजित : डॉ. दीक्षित आलेत वाटतं !

इन्स्पेक्टर : बरं झालं ! माझ्या दृष्टीने; त्यांना भेटणं आवश्यक आहे.

चारुलता : मीही त्यांचीच वाट पाहतेय !

(डॉक्टर दीक्षित-म्हणजे पूर्वीचे सुब्रह्मण्यम्-दिवाणखान्यात येतात. त्यांच्या हातात ब्रिफकेस आहे. दुसऱ्या हातात मानसशास्त्राची जाडजूड पुस्तके आहेत. डोळ्यांवर चश्मा. ते सुटात आहेत. चारुलता त्यांच्या हातांतून ब्रिफकेस व पुस्तकं घेते.)

रणजित : या...या डॉक्टर, अगदी वेळेवर आलात !

डॉ. दिक्षित : डॉक्टर आणि पोलिस कधीच वेळेवर येत नाहीत; अशी उगीचच तक्रार करता तुम्ही लोकं ! (इन्स्पेक्टरकडे पाहत) अेनी वे, व्हॉट इज द् मॅटर ? बाहेर पोलिसांच्या गाड्या लागल्या आहेत...

रणजित : (ओळख करून देत) इन्स्पेक्टर सूर्यवंशी-फ्रॉम मालाड पोलिस स्टेशन— डॉ. दिक्षित, वेलनोन सायकोथेरापीस्ट !

डॉ. दिक्षित : नथिंग इज सिरीयस, आय सपोझ !...(रणजित मानेनं नाही म्हणतो) दॅट्स फाईन...नाऊ टु द् पेशंट...गुड आफ्टरनून, मिसेस परदेशी...हाव आर यू फीलिंग टुडे ?

निशा : सुब्रह्मण्यम, तुम्ही तिकडे मरून पडला होता ना ? माझ्यासमोर हिनं (पद्मा) तुमच्यावर गोळ्या झाडल्या होत्या; आठवतंय ?

डॉ. दिक्षित : मिसेस परदेशी, भलते-सलते विचार डोक्यातून काढून टाका ! चला-डोळे दाखवा पाहू... जीभ दाखवा... (निशा विचित्र-वेडावाकडा चेहरा करून दाखवते- रणजितला) औषधाचा काहीच परिणाम होत नाहीए...यांचा पॅरोनाईक सीझोफ्रेनीआ डेंजरस अवस्थेकडे झुकत चालला आहे. माझ्या मते, ही वेडाची पहिली पायरी आहे. वेळीच सावरता आलं नाही, तर मात्र पुढे ह्या व्हायलंट व्हायची शक्यता आहे ! ( चारुलतास)

नर्स; ह्यांना फॅनीसायक्लोडाईनचं इंजेक्शन दिलं... ?

चारुलता : देतेय, सर—

डॉ. दिक्षित : अजून दिलं नाही ?... वेळच्या वेळी कामं करत जा; हे कितींदा सांगायचं तुम्हाला ?

(चारुलता ट्रेमधून इंजेक्शन घेते. बॉटलमधून इंजेक्शनमध्ये लिक्वीड भरते...कापूस व इंजेक्शन डॉ. दिक्षितांकडे देते.)

निशा : खबरदार कुणी माझ्या अंगाला हात लावलात तर!...तुम्ही सगळे माझ्या जिवावर उठला आहात—

(निशाकडून प्रतिकार केला जातो; पण डॉ. दिक्षित व पद्मा बळजबरीने निशाला इंजेक्शन देतात. त्यानंतर निशा शांत होते; व बेशुद्ध अवस्थेत सोफ्यावर पडून राहते)

इन्स्पेक्टर : ह्या आजारावर काही परमनंट औषध आहे का, डॉक्टर ?

(पॉझ–डॉ. दिक्षित इन्स्पेक्टरकडे टक लावून पाहतात. नंतर नकारार्थी मान हलवून खांदे उडवतात.) मिस्टर परदेशी...शेवटी तुम्ही काय करायचं ठरवलंय ?...आय मीन; ह्यांच्या बाबतीत . ?"

रणजित : (हताशपणे) आय डोन्ट नो...फ्रॅन्कली स्पीकींग...माझं डोकंच चालत नाहीए– हा प्रॉब्लेम मला शक्य तितक्या लवकर सॉल्व करायलाच पाहिजे ! मी माझ्या बायकोच्या नावावर बरीच बिझनेस इन्व्हेस्टमेन्ट केलीय...आणि ह्या परिस्थितीत तिच्या हातून पैशांचा व्यवहार धडपणे होईल; असं वाटत नाही...इन्स्पेक्टर, मी तुम्हाला थोडा त्रास देणार आहे...इथं घडलेला प्रकार तुम्ही पाह्यलाच आहे. त्याचं मला तुमच्याकडून स्टेटमेन्ट हवं आहे. त्या आधारावर मला बँकेकडून फॅसीलिटी मिळू शकेल– आय मीन; हिचं अकाउंट ऑपरेट करायची परवानगी मिळू शकेल !

इन्स्पेक्टर : ओह शुअर ! मी नवीन स्टेटमेन्ट तयार करणारच आहे. कारण मी ह्यांच्या-कडून (निशा) ऐकलं वेगळं आणि पाह्यलं भलतंच !

रणजित : डॉक्टर, मला तुमचंही मेडिकल सर्टिफिकेट लागेल ! बँकेसाठी; आयमीन.

चारुलता : बँकेच्या विषयावरून आठवण झाली...इन्स्पेक्टर, आज सकाळी मॅडमने काय पराक्रम केला; पहायचंय... ?

(खिशातून; निशाने सही केलेले सगळे बेअरर चेक्स काढून दाखवते) एकूण दोन लाखांचे चेक्स् आहेत हे...

इन्स्पेक्टर : ऑह माय गॉड...इट्स जस्ट हॉरिबल !

चारुलता : नीट लक्ष देऊन पहा... सगळे सही केलेले बेअरर चेक्स आहेत ! नशीब; घरातच वाटले ! रस्त्यावर जाऊन वाटले असते तर... ?

रणजित : (बेशुद्धावस्थेत पडलेल्या निशाकडे जाऊन) धिस इज लिमिट, निशा...

अशाने तू मला कंगाल करशील!

डॉ. दिक्षित : रणजित; यू कान्ट ब्लेम हर...तिच्या डोक्यावर परिणाम झालाय!

इन्स्पेक्टर : यांचे कुणी नातेवाईक?

रणजित : कुणीच्च नाहीत!

इन्स्पेक्टर : इथं नाही; स्वित्झरलॅण्डमध्ये...?

रणजित : हिचा एक काका होता...पण तेही आता हयात नाहीत...हं...स्वीस बँकेत हिच्या नावाचं अकाउंट आहे मात्र...

इन्स्पेक्टर : मग माझा एक सल्ला ऐका...ताबडतोब तुमच्या मिसेसचे सगळे अकाउंटस ब्लॉक करून ठाका!

रणजित : हे असलं काही तरी होणार ह्याची मला पूर्ण कल्पना होती. म्हणूनच सगळ्या बँकांना मी रिक्वेस्टींग लेटर्स पाठवायचा निर्णय घेतलाय!

डॉ. दिक्षित : मग वाट कसली पाहताय! ताबडतोब बँकेला कळवायलाच हवं.

रणजित : त्याबरोबर मला तुमचं मेडिकल सर्टिफिकेटसुद्धा जोडावं लागेल!

डॉ. दिक्षित : केव्हाही माझ्या कन्सर्टिंगरूममध्ये या आणि घेऊन जा–

रणजित : (इन्स्पेक्टरला) आणि तुमचं स्टेटमेन्ट— ?

इन्स्पेक्टर : मी तयार करून ठेवतो. उद्या येऊन घेऊन जा! (पॉझ–हातात असलेल्या चेक्सकडे पाहत) ह्या चेक्सचं काय करायचं?

रणजित : काय करणार? माझ्याकडे द्या...किंवा तुम्हीच तुमच्या हाताने फाडून टाका...!

(इन्स्पेक्टर हसतो व सर्व चेक्स रणजितकडे देतो. रणजित त्यांपैकी एक चेक बाजूला करून इतर सर्व चेक्स फाडतो.)

रणजित : इन्स्पेक्टर, तुमचं गाव कुठलं?

इन्स्पेक्टर : मी साताऱ्याचा! का?

रणजित : हा पन्नास हजारांचा बेअरर चेक-ठेवा तुमच्याकडे! गावातल्या शाळेच्या मदतीसाठी किंवा देऊळाच्या उद्धारासाठी!

इन्स्पेक्टर : (चेक घेऊन) थँक्यू! उद्या स्टेटमेन्ट घेऊन मी स्वतःच येतो!

रणजित : येताना चेक घेऊन या...त्यावर माझी काउंटरसाईन करतो...म्हणजे तो चेक वॅलीड होईल. काय?

इन्स्पेक्टर : तुम्ही म्हणाल तसं! येतो मी. (जायला वळतो.)

निशा : (अर्धवट शुद्धीत आल्याप्रमाणे) थांबा, इन्स्पेक्टर...प्लीज, तुम्ही जाऊ नका...

इन्स्पेक्टर : तुम्ही विश्रांती घ्या...उठू नका ..उद्या–परवा येईन तेव्हा बोलू आपण!

निशा : इन्स्पेक्टर...मी तुम्हाला हात जोडून सांगतेय...तुम्ही जाऊ नका...ही लोकं माझा जीव घेतील—

इन्स्पेक्टर : डोक्याला ताप करून घेऊ नका...लवकर बऱ्या व्हा!

(बाहेर जातो– बाहेर असलेल्या पोलिस स्टाफला उद्देशून) चलारे...जगदाळे कदम...गाड्यात बसा– ड्राईव्हर कुठे आहे...? बोलव त्याला.

(बाहेर तिघाचौघांच्या बोलण्याचा आवाज–त्यानंतर जीप व व्हॅन स्टार्ट व्हायचा आवाज–नंतर सायरनचा आवाज ऐकू येतो. रणजित हळूहळू बाहेरच्या दाराकडे जातो. सगळे निघून गेले आहेत ह्याची खात्री करून घेतो; व नंतर निशाकडे टक लावून पाहतो; जी अतिशय घाबरलेली आहे. तिघे तिच्याकडे पाहून हसतात.)

रणजित : निशा डार्लिंग, ह्या त्रिकुटाची कामगिरी कशी काय वाटली? तुझी फसवणूक झाली; मूर्खांत गणना झाली; हे विसरून जायचं...अगं, खेळायच्या मैदानात कुणाचा तरी पराभव होणारच! म्हणून काय विजयीवीरांचं अभिनंदनही करू नये? अगं, तुझ्या मदतीसाठी आलेला इन्स्पेक्टर; तुला मदत न करता निघून गेला! आता कुणाची वाट पाहतेस... अभिजित भाऊजींची...? अगं, हा काय तुझा अभिजित...(सुब्रह्मण्यम्‌कडून चश्मा घेतो) वहिनी, तुम्हाला घटस्फोट मिळावा, म्हणून मी वाट्टेल ते करायला तयार आहे. (सगळे हसतात)

सुब्रह्मण्यम् : सुपर्ब! क्या डबलरोल करता है यार... फॅन्टास्टीक!

चारुलता : आणि तुम्ही... हात पाहण्याचा सीन काय सुंदर करता हो; धंदेवाईक हात पाहणाऱ्यांनी तुमचे पाय धरायला हवेत!

सुब्रह्मण्यम् : खरी कमाल तुझी आहे, चारु! तीन महिने ह्या बाईबरोबर राह्यलीस; पण तिला थांगपत्ता लागू दिला नाहीस! जवाब नही तेरा!

रणजित : निशा डार्लिंग, ह्या कटासाठी लागणारी प्रत्येक डुप्लीकेट वस्तू तयार करणारे ग्रेट तंत्रज्ञ; मिस्टर सुब्रह्मण्यम् उर्फ डॉ. दिक्षित उर्फ अडवाणी... फ्रॉम उल्हासनगर! तिहार जेलच्या एन्व्हॅलपची कॉपी... खरं पिस्तुल; खोट्या गोळ्या... (तळहात दाखवीत) आणि हात चिरला गेला; त्या काचेची करामतसुद्धा ह्यांचीच!

चारुलता : त्यांना दाखव रे ती ट्रिक, रक्त कसं निघालं! पाहून घ्या, मॅडम! (रणजित खिशातून लाल रंगाची कॅप्सूल काढतो... हातात ठेवतो. मूठ आवळून टेबलावर हात आपटतो– कॅप्सूल फुटते व लाल रंगाच्या प्रवाहाने त्याचा हात भरून जातो)

रणजित : अभिजित आणि रणजित ही माझी वेगवेगळी दोन रूपं तुझ्या डोक्यात बसावी, म्हणून हा उपद्‌व्याप! बॅन्डेजवाला रणजित आणि चष्मेवाला अभिजित!

(पद्‌मा लपवून ठेवलेलं ट्रान्समीटर एखाद्या पुस्तकाच्या मागून काढते.)

पद्मा : आणि मॅडम, तुमचं ह्या घरातलं इन्स्पेक्टरबरोबरचं सगळं बोलणं; ह्या ट्रान्समीटरच्या मदतीनं आम्ही ऐकू शकलो...

(वरील संवाद बोलले जात असताना सुब्रह्मण्यम् एखाद्या खोलीत जाऊन छोटासा टेपरेकॉर्डर घेऊन येतो– त्याचा नॉब दाबून)

सुब्रह्मण्यम् : आणि हा गोव्याचा ट्रंक-कॉल!

(टेपरेकॉर्डर ऑन करतो. त्यातून खालील संवाद ऐकू येतात "हॅल्लो, इज इट सिक्स... सेव्हन...टू...वन...फोर— सिक्स वन ? (पॉझ) हॅलो... मिसेस निशा परदेशी प्लीज (पॉझ) होल्ड द लाईन, ट्रंक कॉल फ्रॉम पणजी... स्पीक हिअर— ")

रणजित : हॅल्लो, निशा डार्लिंग... मी रणजित बोलतोय... पणजीहून नाही ह्याच बंगल्याच्या आऊटहाऊसमधून बोलतोय... सगळंच बनावट! तो इन्स्पेक्टर सोडल्यास ह्या कटातली प्रत्येक गोष्ट बनावट! तिथं मात्र आम्हांला खराखुरा इन्स्पेक्टरच हवा होता! तुमचं बोलणं आम्ही समुद्रावर बसून ऐकत होतो...तो तुझा प्रत्येक मुद्दा खोटा ठरवत होता– शेवटी कंटाळून तो म्हणालासुद्धा,– दिवसाढवळ्या पडणाऱ्या स्वप्नाला भास म्हणतात; भास! बस्स, आमचं पुढचं काम होतं; इथं येऊन फिनिशिंग टच द्यायचं!

निशा : नो क्राईम इज परफेक्ट... तुम्ही नक्कीच पकडले जाल—

रणजित : अगं, ही आमची पहिली वेळ थोडीच आहे!... ह्या त्रिकुटाचा हा चवथा प्रयोग होता. पहिली; पूनम माथूर– दिल्लीची! तिला वेड लागलं आणि तिनं स्वतःला जाळून घेतलं!

सुब्रह्मण्यम् : दुसरी; बंगलोरची सुवर्णा पुजारी! तिनं गळफास लावून आत्महत्या केली!

पद्मा : तिसरी बडोद्याची अश्विनी पटेल! तिला समुद्रात बुडवून टाकली! आता पाचव्या प्रयोगाचं आमंत्रण कुठून येतंय पहायचंय्!

सुब्रह्मण्यम् : अरे, माझं ऐका कुणीतरी. आपली भारतातली कामगिरी आता पुरे झाली... फॉरीन जायेंगे और फॉरीन अेक्सचेंज लेके आयेंगे!

रणजित : (पद्माला मिठीत घेत) अरे, तुम्ही लोकं मला किती वेळा विधुर करणार ?

पद्मा : जसा खराखुरा विधुर होतोय! (निशाला) मॅडम, ह्याच्या प्रत्येक बायकांनी आम्हाला पन्नास–पन्नास हजारांची देणगी दिलीय...मरण्यापूर्वी...तुमचा फिगर सांगून टाका!

निशा : रणजित, तुला माझी संपत्ती आणि पैसाच हवा आहे ना ? मी सर्व काही तुला द्यायला तयार आहे...पण मला इथून जाऊ द्या...मला जगायचंय—

रणजित : अरे, हिला जगायचंय...बिच्चारी...!

सुब्रह्मण्यम : ते शक्य नाही...आमच्या कटाप्रमाणे; तुम्हाला मरावंच लागेल!

पद्मा : आपण हिला चॉईस देऊ या... बुडवून, जाळून हे फार जुनं झालं...कुछ

नॉवेल आयडीया.. बोला मॅडम, कसं मरायचंय तुम्हाला... ? (तिघेही तिला ट्रॅप करतात)

रणजित : हिला आपण मेन्टल हॉस्पिटलात पाठवू–

निशा : नाही–

रणजित : करेक्ट! वेडी...तिथं गेल्यावर शहाणा माणूसही वेडा होतो!

निशा : मी वेडी नाही...मी वेडी नाही!

रणजित : प्रत्येक वेडा माणूस असंच म्हणतो!

सुब्रह्मण्यम् : मी फोन करून ॲम्ब्युलन्स मागवतो! (फोन करायला रिसीव्हर उचलतो.)

निशा : नाही...मी ..वेडी...नाही...वेडी नाही... (पळायचा प्रयत्न करते–तिघेही तिला अडवतात)

निशा : प्लीज, मला मारू नका ..तुम्ही समजताय तशी मी श्रीमंत बाई नाहीए... श्रीमंतीचं मी नाटक केलं होतं... तुझ्याशी लग्न व्हावं म्हणून...माझं नाव निशा नाहीए...माझं नाव—

रणजित : निशा नाही ? मग कोण आहेस तू?

निशा : मी...मी...पूनम माथूर...नाही–नाही...सुवर्णा पुजारी...किंवा अश्विनी पटेल...पण मी निशा नाही...निशा मुळीच नाही... (बेडरूमच्या दिशेत धावत जाते.)

सुब्रह्मण्यम् : मेंटल हॉस्पिटलमध्ये पाठवायची गरज नाही आता!

रणजित : (ती गेलेल्या दिशेने) जा...जा–बेडरूममध्ये तुझ्या स्वागताची जय्यत तयारी करून ठेवलीय आम्ही! (सगळे आनंदाने हसतात– पद्मा बारकडे जाते व व्हिस्कीचे तीन ग्लास भरते.)

सुब्रह्मण्यम् : कम ऑन बॉईज, लेट अस सेलीब्रेट द् व्हिक्टरी. (पद्मा सर्वांना व्हिस्कीचा ग्लास देते.)

सुब्रह्मण्यम् : रणजित, उद्याच्या उद्या त्या इन्स्पेक्टरकडून स्टेटमेन्ट ताब्यात घे!

रणजित : ते काम माझ्याकडे लागलं... तुम्ही डॉक्टरचं सर्टिफिकेट तयार करायला घ्या!

सुब्रह्मण्यम् : शुअर! उद्याच तयार करून टाकतो!

पद्मा : (आपल्या हातातला ग्लास उंचावून) चीअर्स!
(ह्याच वेळेस बेडरूममधून निशाची किंकाळी ऐकू येते– सगळे त्या दिशेने पाहतात.)

सुब्रह्मण्यम् : खेळ खतम! पद्मा,–
(पद्मा ग्लास ठेवून बेडरूमच्या दिशेस जाते. पॉझ–काही क्षणांनंतर)

पद्मा : (किंचाळून) रणजित—
(पद्मा बाहेर येते; तेव्हा तिच्या पाठोपाठ निशा आहे व तिच्या हातात

रिव्हॉल्वर आहे– जे पद्माच्या पाठीवर रोखून ठेवलं आहे. पद्माचे दोन्ही हात वर केलेले आहेत.)

निशा : (रणजित व सुब्रह्मण्यमची हालचाल सुरू होते) डोन्ट मूव्ह...आय वॉर्न यू. ह्यात खऱ्या गोळ्या आहेत!... (पॉझ) बसा...खाली बसा...मला एक गौप्यस्फोट करायचाय! उभ्या–उभ्या पडण्यापेक्षा; बसल्या जागी पडलात, तर मार कमी बसेल! माझं नाव निशा नाहीए...आणि मी श्रीमंत तर मुळीच नाहीए! माझा कुणीही काका–मामा नाही; ज्याचं स्वीस बँकेत अकाउंट आहे! मी... सी. आय. डी. ऑफिसर; मिस मोनिका मजूमदार (आयकार्ड दाखवते. तिघे तिथून पळायचा प्रयत्न करतात) डोन्ट मुव्ह... (बाहेर पाहत) इन्स्पेक्टर सूर्यवंशी... (इन्स्पेक्टर व दोन हवालदार दिवाण-खान्यात येतात) आम्ही इथं बसून जी चर्चा केली; तो आमच्या कटाचा एक भाग होता! आमचं इथलं बोलणं चोरून ऐकण्यासाठी तुम्ही ट्रान्स-मीटर्सची पेरणी कराल, ह्याची खात्री होती आम्हाला! सगळंच आपल्या प्लॅनप्रमाणे घडलं असं समजून तुम्ही धावत आलात, आणि फसलात!... पहिली दिल्लीची पूनम माथूर–जिनं स्वतःला जाळून घेतलं; दुसरी बंगलोरची सुवर्णा पुजारी–जिनं गळफास लावून घेतला; तिसरी बडोद्याची अश्विनी पटेल –जिला जलसमाधी घ्यावी लागली तुमच्यामुळे! दिल्ली, बँगलोर, बडोदा अशी खुनांची हॅटट्रिक करून, चवथा हुंडाबळी घेण्यासाठी; व्हाया कलकत्ता तुम्ही मुंबईत आलात आणि अडकलात! गुन्हेगार कितीही चलाख असला तरी, तो पोलिसांसाठी एकतरी धागा सोडून जातोच! तो धागा म्हणजे; अश्विनी पटेल! माझ्या जियाभाबाची मैत्रीण! तिच्या मृत्यूनंतर तिचा एक फोटो-आल्बम माझ्या पाहण्यात आला! त्यात 'तू' होतास– रणछोडदास पटेल ह्या नावाने! कलकत्त्यात तू एका श्रीमंत बाईच्या शोधात होतास, आणि मी तुझ्या शोधात होते! मी तुझ्याशी लग्न का केलं ठाऊक आहे? निरप-राध स्त्रियांच्या खुनांची शृंखला मला मोडून काढायची होती; म्हणूनच मी तुझ्याशी लग्न केलं! ते लग्न नव्हतं–भास होता भास! सूर्यवंशी, ह्या विदुषकांना ताब्यात घ्या... समाजाला लागलेली कीड आहात तुम्ही! तुम्हाला जगण्याचा अधिकार नाही.

(सूर्यवंशी रणजितला बेड्या घालतात. काही क्षणांनंतर टेलीफोनची बेल वाजते– सूर्यवंशी फोन घ्यायला जातो.)

निशा : जस्ट ए मिनिट... (फोन घेते) हॅल्लो ..कोण बोलतंय... ? ओह, पास्कल ... ? वाईन शॉपवाले... ? काय म्हणालात... ? पाच हजार रुपये वसूल करायचेय तुम्हाला...रणजितकडून... ? तुम्हाला पैसे मिळतील; पण त्यांचं नाव आणि पत्ता बदललाय...त्यांचा नवीन पत्ता आहे– मिस्टर दळिंदर;

मार्वे रोड पोलिस स्टेशन–मालाड...थँक्यू !
(फोन खाली ठेवते व पडदा पडतो)

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २२५७५ दि. ५।५।८८
वि. ना।२५ क्र.

IRBK-0122575

# आम्ही प्रकाशित केलेली नाटके

| | |
|---|---|
| संगीत रंकाचे राज्य | वि. स. खांडेकर |
| स्वामी | रणजित देसाई |
| श्रीमान योगी | " |
| वारसा | " |
| हे बंध रेशमाचे | " |
| रामशास्त्री | " |
| धन अपुरे | " |
| लोकनायक | " |
| तानसेन | " |
| दुभंग | रत्नाकर मतकरी |
| जोडीदार | " |
| अग्निदिव्य | " |
| कुर्यात सदा टिंगलम् | शिवराज गोर्ले |
| काळोख देत हुंकार | दिलीप परदेशी |
| सत्यं शिवम् सुंदरम् | " |
| मातृवेणा | " |
| तळहातीच्या नाजूक रेषा | " |
| गोष्ट तशी जुनी; पण | " |
| म्हाराज म्येले | " |
| अस्त | " |
| नाटक | " |
| काळी बेबी | " |
| निष्पाप | " |
| मन धुवाधार | " |

| | |
|---|---|
| टिळेकरांच्या एकांकिका | चंद्रसेन टिळेकर |
| माझी बायको माझी मेव्हणी | हिराकांत कलगुटकर |
| वेलकम माय डियर | ,, |
| नवरा भाड्याने पाहिजे | ,, |
| बायका त्या बायकाच | दत्ता केशव |
| लागेबांधे | ,, |
| साक्षीपूरम | रामनाथ च्व्हाण |
| माझ्या बायकोचा नवरा | प्रभाकर तामणे |
| घोळात घोळ | बबन प्रभू |
| पिकलं पान | रा. रं. बोराडे |
| लफडा सदन | सुरेश पिप्रोडिया |
| बाईसाहेब | ,, |
| लैला ओ लैला | ,, |
| राहू केतू | ,, |
| ऊन पाऊस | सदानंद दळवी |
| बेअब्रू | ,, |
| डाग | ,, |
| परपुरुष | ,, |
| बेगम शबाब | रमेश पवार |
| आमचं प्रायव्हेट लिमिटेड | ,, |
| रंगा ड्रायव्हर | दत्ता खेबूडकर |
| डाकू विक्राळसिंग | साईदास आपटे |
| प्रतापगडच्या छायेत | ,, |
| अमोघ | रतनलाल भंडारी |
| प्रयोगक्षम निवडक एकांकिका | सं. वि. भा. देशपांडे |
| राष्ट्र / नातं | चंद्रकांत देशपांडे |
| एक गगनभेदी किंकाळी / दिनकर पुरोहिताचा खून | ,, |
| मृत्युदान | सतीश कर्णिक |
| बोनसाय | ,, |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे